सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. १८ ऑक्टोबर २०२५ वर्ष - तिसरे अंक १९४ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com







# भंगारातून रेल्वेला मिळाले २,२३५ कोटी रुपये!

## सुमारे १.४५ लाख चौरस फूट कार्यालयीन जागा मोकळी

नवी दिल्ली : स्वच्छ भारत अभियान ५.० अंतर्गत स्वच्छता आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात भारतीय रेल्वेने लक्षणीय प्रगती केली आहे. आतापर्यंत, भंगार लिलावातून रेल्वेने २,२३५ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे आणि अंदाजे १.४५ लाख चौरस फूट कार्यालयीन जागा मोकळी केली आहे.

रेल्वे मंत्रालयाच्या मते, देशभरातील रेल्वे स्थानके, कार्यालये आणि परिसरात आतापर्यंत २९,९२१ स्वच्छता मोहिमा राबविण्यात आल्या आहेत. रेल्वेने भंगार पुनर्वापरासाठी आकर्षक मॉडेल्स विकसित केले आहेत, ज्यामुळे कचरा ते संपत्ती ही संकल्पना पुढे आणली जात आहे.

मंत्रालयाने म्हटले आहे की ई-कचरा (इलेक्ट्रॉनिक कचरा) च्या विल्हेवाटीवर विशेष लक्ष दिले जात आहे आणि त्यासाठी स्वतंत्र लेखा ठेवला जात आहे. प्रशासकीय सुधारणांअंतर्गत, आतापर्यंत ५० हजारांहून अधिक फायलींचे पुनरावलोकन करण्यात आले आहे, त्यापैकी २०,२७७ बंद किंवा कालबाह्य घोषित करण्यात आल्या आहेत आणि काढून टाकण्यात आल्या आहेत. शिवाय, आतापर्यंत १.३७ लाख सार्वजनिक तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे, जे रेल्वेच्या नागरिक-केंद्रित सेवा भावनेचे प्रतिबिंब आहे. लोकसहभागाला आणखी बळकटी देत, रेल्वे मंत्रालयाने विविध स्थानकांवर ४०० हून अधिक अमृत संवाद कार्यक्रमांचे आयोजन केले आहे, ज्यामुळे प्रवाशांशी थेट संवाद साधला गेला आहे.

# तुम्ही पंतप्रधान होण्याच्या लायकीचे नाही

## अमेरिकन गायिकेने राहुल गांधींना फटकारले

नवी दिल्ली: काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर केलेल्या टीकेला अमेरिकन पॉप गायिका मेरी मिलबेन यांनी 'द' (ट्विटर) वरून जहाल प्रत्युत्तर दिले आहे. राहुल गांधी यांनी अलीकडेच, पंतप्रधान मोदी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना घाबरतात आणि उपेक्षा होऊनही त्यांचे अभिनंदन करत राहतात, असा आरोप केला होता.

मिलबेन यांचा खरमरीत पलटवार

राहुल गांधींना थेट लक्ष्य करत मिलबेन यांनी लिहिले, तुमचे म्हणणे चुकीचे आहे, राहुल गांधी. पंतप्रधान मोदी हे ट्रम्प यांना घाबरत नाहीत. मोदी हे दीर्घकालीन धोरणांची समज असलेले आणि अमेरिका व भारत यांच्यातील मुत्सद्देगिरीचे (ऊळश्रिारलू) उत्तम नेतृत्व करणारे नेते आहेत.



मोदींच्या निर्णयाचे समर्थन करताना मिलबेन पुढे म्हणाल्या, जसं ट्रम्प नेहमी अमेरिकेच्या हितासाठी निर्णय घेतात, तसंच मोदीही भारताच्या फायद्यासाठी निर्णय घेत आहेत. राष्ट्रप्रमुख हेच करतात-जे त्यांच्या देशासाठी योग्य आहे.

तुम्ही पीएम होण्यास पात्र नाही

मिलबेन इथेच थांबल्या नाहीत. राहुल गांधींच्या नेतृत्वाबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्या म्हणाल्या, तुमच्याकडून अशा प्रकारच्या नेतृत्वाच्या समजुतीची अपेक्षा नाही, कारण तुम्ही भारताचे पंतप्रधान होण्याची अर्हता किंवा तीव्र बुद्धिमत्ता गाठलेली नाही.

त्यांनी राहुल गांधींच्या परदेश दौऱ्याची खिल्ली उडवत म्हटले, तुम्ही 'आय हेट इंडिया' टूरवर गेला आहात, ज्याचे एकमेव प्रेक्षक तुम्ही स्वतः आहात. त्यामुळे चांगलं होईल की तुम्ही परत याल. राहुल गांधी यांनी पंतप्रधान मोदींवर आरोप करताना ट्रम्प यांच्याकडून 'ऑपरेशन सिंदूर'वरील विधानाला विरोध न करणे, गाझा शांतता करारातून माघार घेणे आणि रशियन तेल खरेदीवर ट्रम्प यांना निर्णय जाहीर करण्याची संधी देणे असे पाच मुद्दे उपस्थित केले होते. या पार्श्वभूमीवर, मोदींच्या कार्यशैलीचे कौतुक करणाऱ्या मेरी मिलबेन यांनी थेट राहुल गांधींवर निशाणा साधला.

## भाजप आ. शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनाने जनसेवेचे एक समर्पित नेतृत्व हरपले



राहुरी : भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या अकस्मात निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या निधनाने राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त केली जात आहे. शिवाजीराव कर्डिले यांनी आयुष्यभर जनसेवेचा ध्यास घेतला होता. समाजातील सर्व घटकांना जोडून विकासाच्या कार्यात त्यांनी सातत्याने सहभाग नोंदवला. त्यांच्या नेतृत्वाखाली राहुरी तालुक्यात अनेक विकासकामे झाली असून, लोकसंग्रह आणि लोकसेवा ही त्यांची ओळख होती.

त्यांच्या जाण्याने भारतीय जनता पार्टीने एक समर्पित, अनुभवसंपन्न आणि जनतेच्या मनाशी घट्ट नातं असलेलं नेतृत्व गमावलं आहे. पक्षाच्या तसेच मतदारसंघातील कार्यकर्त्यांमध्ये शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवाला श्रद्धांजली वाहताना सर्व स्तरांतून शोकसंदेश व्यक्त होत आहेत.




## विश्लेषण

ॲड. अमितोष पारीक

# धर्मस्वातंत्र्य म्हणजे धर्मांतराला परवानगी नव्हे

जेव्हा आपण 'धर्मांतर' हा शब्द ऐकतो तेव्हा तो एक गैर-भारतीय संकल्पना प्रतिबिंबित करतो. म्हणून, या संकल्पनेचा मुळापासून विचार केला पाहिजे. धर्मांतर ही एक पाश्चात्त्य संकल्पना आहे आणि हा शब्द लॅटिन भाषेतून आला आहे. जेव्हा एखादी व्यक्ती किंवा गट जबरदस्तीने, फसवणुकीने, प्रलोभनाने, विवाहाच्या बहाण्याने किंवा इतर कोणत्याही पद्धतीने आपल्या धर्माच्या प्रथा, आचरण आणि मूल्ये यांचा त्याग करून नवीन धार्मिक श्रद्धा, मूल्ये स्वीकारतो तेव्हा त्याला धर्मांतर म्हणता येऊ शकते. म्हणूनच या प्रक्रियेला दत्तक नव्हे तर धर्मांतर असे म्हटले गेले आहे.

### भारत धर्मांतराचा बळी

बऱ्याच काळापासून, भारत धर्मांतराच्या आजाराशी झुंजत आहे. म्हणूनच, हिंदूंना फसवणुकीच्या मार्गांनी धर्मांतर करण्यापासून वाचवण्यासाठी धर्मांतर विरोधी कायदे करण्यात आले. धर्म हा राष्ट्राचा सर्वांत महत्त्वाचा पाया मानला जातो. भारत हे अनेक धर्मांचे घर आहे. परंतु जर धर्म स्वातंत्र्याचा आणि संवैधानिक मूल्यांचा गैरवापर करून फसवणुकीवा मार्ग अवलंबला किंवा कटकारस्थान करून धर्तांतर घडविले तर भारतीय संविधान राज्य यंत्रणेला नागरिकांच्या धर्म-श्रद्धेचे रक्षण करण्यासाठी कायदे करण्याचा अधिकार प्रदान करते.

### वीर सावरकर व 'घरवापसी'

विशिष्ट धर्माचे अनुयायी व प्रचारक धर्मप्रसाराच्या स्वातंत्र्याचा अधिकार म्हणून अन्य धर्मातील लोकांना आपल्या धर्मात ओढण्यासाठी नेहमीच खटपट करीत असतात. 'धार्मिक स्वातंत्र्य म्हणजेच धर्मांतर' असेच त्यांचे समीकरण असते. मात्र, अशा परिस्थितीत समाजाच्या व्यापक हितासाठी अशा धर्म स्वातंत्र्यांच्या वापराचे नियमन करण्यासाठी राज्य यंत्रणेने अर्थात सरकारने हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर हिंदूंच्या होणाऱ्या धर्मांतराबद्दल खूप चिंतित होते आणि ज्या हिंदूंनी इतर धर्मांचा स्वीकार केला आहे त्यांना त्यांच्या मूळ धर्मात परत येण्यास अर्थात 'घरवापसी'ला प्रोत्साहित केले पाहिजे, असे त्यांचे ठाम मत होते. 'धर्मांतर म्हणजेच राष्ट्रांतर' असेही त्यांचे ठाम प्रतिपादन होते.

धर्मांतर अर्थात धर्म परिवर्तन हे हिंसात्मक कृत्य आहे, असे स्वामी दयानंद सरस्वती यांनी एकदा म्हटले होते. कारण यामुळे केवळ धर्मांतरित व्यक्तीच्या कुटुंबातील इतर सदस्यांनाच नव्हे तर संपूर्ण समुदायावर मानसिक आघात होतो.

### धर्मपरिवर्तनाविषयी गांधीजींचा दृष्टिकोन

सर्व धर्म मूलभूतपणे समान आहेत आणि त्यांच्याबद्दल केवळ परस्पर सहिष्णुताच नव्हे तर त्यांच्यात एकमेकांविषयी सहज आदर असला पाहिजे, असे महात्मा गांधी मानत होते. धर्म परिवर्तन करू इच्छिणाऱ्या व्यक्तीने धर्मांतरात चांगले शोधण्यापेक्षा स्वधर्माचा एक चांगला अनुयायी बनण्याचा प्रयत्न केला पाहिजे. म्हणूनच, भारतीय समाजातील विविध नेत्यांनी भारतीय संविधानाच्या कलम २५ अंतर्गत धर्मपरिवर्तनाला चुकीच्या पद्धतीने संरक्षण देण्याच्या संकल्पनेलाच विरोध केला आहे. म्हणूनच, आता प्रश्न असा उद्भवतो की, जर हे भारतीय संविधानाने दिलेले स्वातंत्र्य असेल तर राज्य यंत्रणा अर्थात सरकारने धर्मांतरविरोधी कायदे का लागू केले असतील. वास्तविक कोणताही कायदा लागू करणे किंवा लागू होणे म्हणजे गुन्हेगारीला आळा घालणे होय. म्हणून थोडक्यात, धर्मांतर अथवा धर्मपरिवर्तन म्हणजे निव्वळ स्वातंत्र्य नाही तर एक गुन्हा आहे.

### धर्मांतरविरोधी कायद्यांचा इतिहास

भारतात धर्मांतरविरोधी कायदा लागू करण्याचा विचार काही नवीन गोष्ट नाही आणि त्याची मुळे ब्रिटिश काळापासून आहेत. आपल्याला हे माहिती आहे की, भारत हा विविधतेने नटलेला देश आहे आणि भारतात धर्मांतरविरोधी कायदे ही जुनी प्रथा आहे. ब्रिटिश कालखंडात मिशनऱ्यांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात धर्मांतर वाढल्याचे दिसून आले आहे. म्हणूनच, याला आळा घालण्यासाठी अनेक संस्थानांनी धर्मांतरविरोधी कायदे लागू केले होते. त्यापैकी प्रमुख म्हणजे राजगढ राज्य अधिनियम, १९३६, पाटणा धर्मस्वातंत्र्य कायदा, १९४२, सुरगुजा राज्य धर्मत्याग कायदा, १९४५ आणि उदयपूर राज्य धर्मांतरविरोधी कायदा १९४६. अशाच प्रकारचे कायदे बिकानेर, जोधपूर, क्लाहंदई आणि कोटा येथेही लागू करण्यात आले होते. येथे हे नमूद करणे महत्त्वाचे आहे की, पहिला आणि सर्वांत महत्त्वपूर्ण धर्मांतरविरोधी कायदा राजगढ राज्य धर्मांतर कायदा, १९३६ मध्ये लागू करण्यात आला होता. ख्रिश्चन धर्माच्या प्रचाराद्वारे धर्मांतर रोखणे आणि ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रवेशावर बंदी घालणे हा या कायद्याचा उद्देश होता.




ब्रिटिश वसाहतवाद्यांनी सनातन धर्माच्या अनुयायांना जबरदस्तीने किंवा प्रलोभनाच्या माध्यमातून लक्ष्य करून मोठ्या प्रमाणात धर्मांतर केले. काँग्रेसची सर्व सरकारने धर्मांतर रोखण्यात अपयशी ठरली. मोदी सरकारने धर्मांतराबाबत कठोर भूमिका घेतल्याने देशातील १२ राज्यांनी धर्मांतराला प्रतिबंधित करणारे कायदे केले आहेत. हे कायदे विशिष्ट समुदायाविरुद्ध आहेत, हा काँग्रेसचा निव्वळ अपप्रचार आहे.

त्यानंतर, धर्म परिवर्तनाच्या समस्येला आळा घालण्यासाठी दुसरा कायदा तयार करण्यात आला, तो म्हणजे सुरगुजा धर्मत्याग कायदा, १९४५. सार्वजनिक शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी दरबारला परवानगी देण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार देऊन हिंदू धर्मातून इस्लाम आणि ख्रिश्चन धर्मात धर्मांतर करण्यास मनाई करणे हा याचा उद्देश होता. उदयपूरमध्ये सर्व धर्म परिवर्तनाच्या प्रकरणांची नोंदणी करणे कायद्यानुसार सक्तीचे होते. येथे हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की, यापैकी बहुतेक कायद्यांतर्गत व्यक्तींना सरकारी एजन्सीसमोर त्यांच्या धर्म परिवर्तनाची नोंदणी करणे आवश्यक होते आणि कायद्यानुसार अल्पवयीन मुलांचे धर्मांतर करता येत नव्हते, एवढेच नव्हे तर धर्मांतर करणारी मुले आपल्या आई-वडिलांच्या इच्छेने नवीन धर्म स्वीकारू शकत नव्हती.

### स्वातंत्र्योत्तर काळात धर्मांतर विरोधी कायदा

भारतीय संविधान स्वीकारल्यापासून, भारतात धर्म परिवर्तनाचे नियमन करण्यासाठी केंद्रीय कायदे करण्याचे अनेक प्रयत्न केले जात होते, तसेच धर्म स्वातंत्र्य राखण्यासाठी आणि द्वेष भावनेतून धर्मांतराच्या प्रयत्नाला आळा घालण्यासाठी कायदा करण्याचे प्रयत्न सुरू झाले. १९५४ मध्ये, सत्ताधारी पक्षाचे सदस्य जेठालाल हरिकृष्ण जोशी यांनी संसदेत भारतीय धर्मांतर (नियमन आणि नोंदणी) विधेयक, १९५४ सादर केले ज्यामध्ये मिशनऱ्यांना अनिवार्य परवाना आणि सरकारी अधिकाऱ्यांकडे धर्मांतराची नोंदणी करण्याची तरतूद होती. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी त्याला कडाडून विरोध केला आणि दुर्दैवाने भारताच्या तत्कालीन पंतप्रधानांच्या आदेशावरून हे विधेयक रद्द करण्यात आले. संदर्भासाठी १९५४ च्या कायद्यातील काही महत्त्वाचे कलम:

धर्मांतर करण्याची पद्धत : कोणतीही व्यक्ती विहित पद्धतीने घोषित केल्याशिवाय किंवा या उद्देशासाठी परवाना देणाऱ्या प्राधिकरणाने दिलेल्या परवानाधारक व्यक्तींच्या मदतीने धार्मिक विधी, अनुष्ठान किंवा समारंभ न करता धर्मांतरित होणार नाही.

धर्मांतराची सूचना : कलम ३ मध्ये तरतूद केल्यानुसार धर्मांतरित होऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने याची सूचना परवाना देणाऱ्या प्राधिकरणाला विहित केलेल्या स्वरूपात द्यावी.

परवाना देणाऱ्या प्राधिकरणाने अशी प्रत्येक सूचना त्याच्या कार्यालयाच्या कोणत्याही विशिष्ट ठिकाणी त्याची एक प्रत चिकटवून आणि निर्धारित केलेल्या इतर पद्धतीने तात्काळ प्रकाशित करावी.

धर्मांतरित व्यक्तीची नोंदणी : प्रत्येक धर्मांतरित व्यक्ती आणि परवानाधारकाने, धर्मांतराच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत, धर्मांतरित व्यक्ती ज्या क्षेत्रात राहत होती त्या क्षेत्रातील परवाना देणाऱ्या प्राधिकरणाला विहित केलेल्या तपशीलांची पूर्तता करावी जेणेकरून त्या प्राधिकरणाला धर्मांतरित व्यक्तीचे नाव रजिस्टरमध्ये प्रविष्ट करता येईल.

संविधान सभेतील चर्चेदरम्यान सरदार वल्लभभाई पटेल यांनीही या महत्त्वाच्या मुद्याला मान्यता दिली होती. ते म्हणाले, ''या देशात हे सर्वज्ञात आहे की सामूहिक धर्मांतर, बळजबरीने धर्मांतर, जबरदस्तीने आणि अयोग्य प्रभावाने धर्मांतर होते आणि आपण ही वस्तुस्थिती लपवू शकत नाही की मुलांचे देखील धर्मांतरण झाले आहे. आई-वडील असलेल्या मुलांचे देखील धर्मांतरण झाले आहे आणि अनाथ मुलांचे देखील धर्मांतरण झाले आहे.''

येथे, हे दर्शविण्यात आले आहे की, १९५४ च्या कायद्यात धर्मांतराची नोंदणी आणि सूचना प्रकाशित करण्याची तरतूद आहे. तसेच धर्मांतराची नोंदणी ठेवण्यासाठी कायद्याच्या कलम ६ अंतर्गत नोंदणी प्राधिकरणाने रजिस्टर राखणे अत्यावश्यक आहे. कायद्याच्या कलम ९ अंतर्गत दंडाची तरतूद करण्यात आली आहे. स्वातंत्र्यापूर्वी आणि नंतर धर्मांतर रोखणे ही काळाची गरज राहिली आहे, हे दिसून येते. १९६० मध्ये संसदेत 'मागास समुदाय (धर्म) संरक्षण विधेयक' नावाचे आणखी एक विधेयक सादर करण्यात आले होते, ज्याचा उद्देश हिंदूंचे 'अभारतीय धर्मांमध्ये' धर्मांतर रोखणे हा होता. या विधेयकातील व्याख्येनुसार, यात इस्लाम, ख्रिश्चन, यहुदी आणि झोरोस्ट्रियन (पारशी) धर्माचा समावेश होता. विशिष्ट धार्मिक श्रद्धांचा अनादर केल्यामुळे संसदेने ते फेटाळून लावले. त्यानंतर पुन्हा १९७९ मध्ये, धर्मांतराला बंदी घालण्यासाठी आणि त्यावर अंकुश ठेवण्यासाठी आणखी एक 'धर्मस्वातंत्र्य विधेयक' सभागृहात सादर करण्यात आले. आंतरधर्मीय धर्मांतरावर अंकुश ठेवणे हा या या विधेयकाचा उद्देश होता. अल्पसंख्यक आयोगाने या विधेयकाला नंतर विरोध केला होता.

स्वतंत्र भारताच्या सभागृहाने वारंवार धर्मांतराचा मुद्दा उपस्थित केला आहे आणि या समस्येवर अंकुश ठेवण्यासाठी आणि त्यावर बंदी घालण्यासाठी विधेयके सादर केली आहेत. परंतु ख्रिश्चन मिशनरी, अल्पसंख्याक आयोग यांनी या विधेयकांना वारंवार विरोध केला आहे. परंतु समस्या अजूनही कायम आहे.

### राज्यस्तरावर धर्मांतर विरोधी कायदे

अनेक प्रयत्न करूनही, धर्मांतराच्या मुद्यावर अंकुश ठेवण्यासाठी भारतात कोणताही केंद्रीय कायदा नाही. संसदीय पाठिंब्याअभावी ही विधेयके संसदेत मंजूर झाली नाहीत. तथापि, राज्य पातळीवर, या संवेदनशील मुद्यावर कायदे करण्यात आले आहेत, ज्यामुळे दुर्भावनापूर्ण हेतूने करण्यात येणारे धर्मांतर सुनिश्चित व नियमन केले जाते. सध्या ओडिशा, मध्य प्रदेश, अरुणाचल प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, झारखंड, कर्नाटक, हरयाणा आणि आता राजस्थान ही १२ राज्ये आहेत ज्यांनी धर्मांतर विरोधी कठोर कायदे लागू केले आहेत. या कायद्यांमध्ये जबरदस्तीने, फसवणूक करून, बळजबरीने, प्रलोभन देऊन किंवा तत्सम स्वरूपाच्या धर्मांतरासाठी विविध शिक्षांची तरतूद आहे.

### धर्मांतर विरोधी कायद्यांतर्गत कायदेशीर कारवाई

१ जानेवारी २०२१ ते एप्रिल २०२३ दरम्यान उत्तर प्रदेश पोलिसांनी राज्यात धर्मांतराशी संबंधित एकूण ४२७ प्रकरणे नोंदवली आहेत. आतापर्यंत एकूण ८३३ जणांना अटक करण्यात आली आहे. १ जानेवारी २०२० ते १५ जुलै २०२५ दरम्यान मध्यप्रदेश कायद्यांतर्गत राज्यात एकूण २८३ गुन्हे दाखल करण्यात आले. अलीकडेच, हरयाणातील नूह येथे हरयाणाच्या धर्मांतर विरोधी कायद्यांतर्गत पहिली अटक करण्यात आली आहे.

धर्मांतर हे राष्ट्रीय सुरक्षेसाठी धोकादायक असल्याचे निरीक्षण भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने आणि इतर विविध उच्च न्यायालयांनीही नोंदवले आहे. म्हणून राज्यांनी त्यांच्या जबाबदाऱ्या लक्षात घेऊन त्यावर कडक कारवाई करणे आवश्यक आहे. भारताचे संविधान कोणत्याही धर्मांतराला प्रोत्साहन देत नाही, हे येथे नमूद करणे महत्त्वाचे आहे. म्हणून धर्म स्वातंत्र्याचा अधिकार कोणालाही इतर कोणत्याही व्यक्तीचे धर्मांतर करण्याचा अधिकार देत नाही. येथे हे देखील नमूद करणे महत्त्वाचे आहे की 'घरवापसी'ला (आपल्या मूळ धर्मात पुन्हा परतणे) संविधानातून वगळण्यात आले आहे. कारण जेव्हा एखादी व्यक्ती कुठल्याही कारणाने परधर्मात गेली व तिला पुन्हा आपल्या मूळ धर्मात म्हणजेच पूर्वजांच्या धर्मात परत यायचे असेल तर याला कोणीही गुन्हा म्हणू शकत नाही. आपण विविध राज्यातील धर्मांतरविरोधी कायद्याकडे पाहिल्यास एक गोष्ट लक्षात आली असेल की त्यात कोणत्याही विशिष्ट धर्माचा उल्लेख करण्यात आलेला नाही. म्हणूनच धर्मांतर विरोधी कायदा एखाद्या विशिष्ट समुदायाविरुद्ध आहे असे म्हणणे हा निव्वळ अपप्रचार आहे. ●●

*(ऑर्गनायझरवरून साभार)*

### राजस्थानात धर्मांतराच्या घटनांमध्ये वाढ

पराक्रम, शौर्य, बलिदान व प्रेरणादायी इतिहासासाठी प्रसिद्ध असलेले राजस्थानानात बळजबरीने किंवा फसवणूक करून घडविण्यात येणाऱ्या धर्मांतराचे प्रमाण वाढत आहे. विविध धार्मिक शक्ती अनैतिक मार्गाने हिंदूंचे धर्मांतर घडवून आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत. राजस्थानमध्ये विशेषत: वनवासी क्षेत्रात धर्मांतराच्या घटना घडत आहेत. गेल्या काही दिवसांत ख्रिश्चन मिशनऱ्यांकडून धर्मांतराच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. मिशनरी संघटना लोकांना पैसे देत आहेत आणि त्यावर बायबलचा संदेश लिहिलेले हँडपंप बसवण्यासारख्या सुविधा देत आहेत.

गंगानगर जिल्ह्यातील सुमन नावाच्या महिलेने सांगितले की तिला बाप्तिस्म्यासाठी दिल्लीला नेण्यात आले आणि तिला २००० ते ५००० रुपयांपर्यंत आर्थिक मदत देण्यात आली. राजस्थानच्या गाडोली, बांसवाडा, जंबुडी, शिवपुरा या जनजाती क्षेत्रांमध्ये अशाप्रकारची प्रकरणे पाहायला मिळाली आहेत. राजस्थानमध्ये धर्मांतराच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत, ज्यामुळे राज्य सरकारला धर्माचे रक्षण आणि राज्यातील धर्मांतराच्या समस्येला आळा घालण्यासाठी हस्तक्षेप करावा लागला.

**खेरथल:** सासरच्या कुटुंबाकडून जबरदस्तीने धर्मांतर करण्यासाठी छळ होत असल्याने मंजा देवी नामक पीडितेने आत्महत्या केली. ती केवळ २५ वर्षांची होती. भरतपूरमध्ये सासरच्या कुटुंबाने केलेल्या धर्मांतर करण्यास भाग पाडल्यामुळे तिने गळफास घेतला. मरण्यापूर्वी तिने एक व्हिडिओ रेकॉर्ड केला ज्यामध्ये तिने पती आणि त्याच्या कुटुंबावर धर्मांतर करण्यासाठी दबाव आणल्याचा आरोप केला.

**झुंझुनू:** मिशनऱ्यांनी रोजगाराच्या नावाखाली प्रलोभन दाखवून प्रार्थना समारंभाच्या नावाखाली अनेक हिंदूंचे धर्मांतर केले.

**कोटा (२०२३) :** मोफत कोचिंगच्या नावाखाली मिशनऱ्यांनी धर्मांतरासाठी दबाव टाकल्यामुळे एका विद्यार्थिनीने आत्महत्या केली.

**बांसवाडा (२०२४) :** मिशनऱ्यांनी मोफत आरोग्य तपासणीच्या नावाखाली वनवासींचे धर्मांतर केले तसेच अनेकांना धर्मांतर करण्यास भाग पाडले.

**सामोद (२०२३):** मिशनऱ्यांनी मोफत शिलाई मशिनच्या नावाखाली हिंदूंना जबरदस्तीने धर्मांतर करण्यास भाग पाडले.



**भरतपूर (२०२४):** एका संघटित जबरदस्तीने धर्मांतर करण्याच्या कार्यक्रमाच्या तक्रारीनंतर एका घरातून २० महिलांसह २८ व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले. सुमारे १०० लोकांना प्रलोभन देऊन या धार्मिक मेळाव्यात सहभागी होण्यासाठी आणण्यात आले होते, असा आरोप आहे. चर्च फाऊंडेशनच्या बॅनरखाली हा धार्मिक मेळावा आयोजित करण्यात आला होता. राजस्थानात हिंदूंना लक्ष्य करून धर्मपरिवर्तन केल्याची अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत. म्हणूनच राज्य सरकारने हस्तक्षेप करणे आणि धर्मांतर विरोधी कायदा तातडीने लागू करणे आवश्यक आणि महत्त्वाचे बनले आहे जेणेकरून अशा समस्यांना आळा घालता येईल आणि संवैधानिक योजनेनुसार जबरदस्तीने धर्मांतर करण्यावर अंकुश आणता येईल. राजस्थान सरकारने अलीकडेच राजस्थान बेकायदेशीर धर्म परिवर्तन प्रतिबंधक विधेयक, २०२५ मंजूर केले आहे ज्याद्वारे चुकीची व संभ्रम निर्माण करणारी माहिती देणे, जबरदस्ती, अयोग्य प्रभाव, सक्ती, प्रलोभन, ऑनलाइन प्रलोभन किंवा कोणत्याही फसव्या, कपटी मार्गाने किंवा विवाहाच्या बहाण्याने एका धर्मातून दुसऱ्या धर्मात बेकायदेशीर धर्मांतर करणे कायद्यानुसार गुन्हा मानले जाईल. राजस्थान विधानसभेने २००६ आणि २००८ मध्ये धर्मपरिवर्तनाचे नियमन करण्यासाठी कायदे पारित केले होते. तथापि, त्यांना मान्यता मिळाली नव्हती. राजस्थान बेकायदेशीर धर्म परिवर्तन प्रतिबंधक विधेयक, २०२५ फेब्रुवारी २०२५ मध्ये विधानसभेत सादर करण्यात आले. ●

## घरवापसी

डॉ. समन्वय नंद

# ओडिशा : ४० वनवासी मूळ धर्मात परतले

ओडिशामधील केंदुझर जिल्ह्यातील घासीपुरा ब्लॉकमधील गंपुर पंचायतीच्या जनजाती वस्तीत राहणारे सहा कुटुंबातील सुमारे ४० सदस्य आपल्या मूळ धर्मात परतले आहेत. काही महिन्यांपूर्वी, ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रभावाखाली येऊन स्वत:ची पारंपरिक संस्कृती आणि हिंदू धर्म सोडून ख्रिश्चन धर्म स्वीकारण्यास प्रेरित झाले होते. मात्र, ख्रिश्चन मिशनऱ्यांनी आपली फसवणूक केल्याचे त्यांच्या अनुभवास आले. आता आपली चूक मान्य करून ते एकत्रितपणे आपल्या मूळ धर्मात परतले आहेत. केंदुझर जिल्ह्यातील धर्म जागरण समन्वय कार्यकर्त्यांच्या आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत एक विशेष घरवापसी समारंभ आयोजित करण्यात आला होता, जिथे या वनवासी बंधू-भगिनींनी आपल्या मूळ धर्मात परतण्याची प्रतिज्ञा केली. पुन्हा स्वधर्मात येणारी कुटुंबे मुंडा आणि संथाल जनजातीची आहेत.

या गावात कन्वर्जनची माहिती मिळाल्यानंतर धर्म जागरण समन्वय विभागाचे वरिष्ठ कार्यकर्ते संबंधित कुटुंबांच्या संपर्कात होते. त्यांनी धर्मांतरित कुटुंबांशी संवाद साधला आणि त्यांना आपल्या सांस्कृतिक मुळांकडे परत येण्याचे आवाहन केले. धर्म जागरण समितीच्या प्रयत्नांना यश येऊन अखेर ही वनवासी कुटुंबे पुन्हा आपल्या मूळ हिंदू धर्मात परतली. घरवापसी केलेल्यांमध्ये केशव मुंडा, गिदा हेम्ब्रम, रवी मुंडा, लव मुंडा, कुश मुंडा, हरी मुंडा, दुर्गा हेम्ब्रम आणि इतरांचा समावेश आहे. घरवापसी केलेल्या कुटुंबांना भगवान जगन्नाथ आणि अन्य देवी-देवतांच्या प्रतिमा भेट देण्यात आल्या. घरवापसी करणाऱ्या सदस्यांनी यावेळी आपल्या कुटुंबीयांसह आणि नातेवाईकांसोबत हिंदू रीतिरिवाज आणि परंपरा पाळण्याची सामूहिक प्रतिज्ञा घेतली.

स्वधर्मात परतणाऱ्या सदस्यांनी ख्रिश्चन मिशनऱ्यांनी त्यांची कशी दिशाभूल केली हे सांगितले. त्यांनी सांगितले की, त्यांच्या कुटुंबातील काही सदस्यांची प्रकृती ठीक नव्हती. त्याचवेळी हे ख्रिश्चन मिशनरी त्यांच्या गावात आले होते. या मिशनऱ्यांनी या वनवासींना सांगितले की, जर त्यांनी येशू ख्रिस्ताला स्वीकारले तर त्यांचे आरोग्य सुधारेल. त्यांच्या प्रभावाखाली येऊन या वनवासींनी आपली मूळ संस्कृती सोडून ख्रिश्चन धर्म स्वीकारला.

ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यानंतर, ते आपल्या मूळ संस्कृतीपासून दुरावले आणि त्यांचे सण साजरे करू शकले नाहीत. अखेर धर्म जागरण समन्वय समितीच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांना आपल्या मुळांकडे परत येण्याचे आवाहन केले. कार्यकर्त्यांच्या प्रेरणेमुळे या वनवासींनी पुन्हा आपल्या मूळ धर्मात येण्यास सहमती दर्शविली. स्वधर्मात परतल्यानंतर ते अतिशय आनंदित व समाधानी आहेत. येत्या काळात, विविध कारणांमुळे धर्मांतरित झालेल्या वनवासी समुदायातील इतर सदस्यांना परत आणण्याचा आम्ही प्रयत्न करू, असे घरवापसी करणाऱ्या या कुटुंबांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.



ओडिशामधील केंदुझर जिल्ह्यातील घासीपुरा ब्लॉकमधील गंपुर पंचायतीच्या जनजाती वस्तीत राहणारे सहा कुटुंबातील सुमारे ४० सदस्य आपल्या मूळ धर्मात परतले आहेत.

घरवापसी करणाऱ्या एका वनवासी युवतीने सांगितले की, ख्रिश्चन धर्म स्वीकारल्यानंतर तिला खूप त्रास सहन करावा लागत होता कारण तिला निसर्गाची पूजा करता येत नव्हती आणि गावातील त्यांच्या समुदायातील सदस्यांसोबत सामुदायिक सण-उत्सव साजरे करता येत नव्हते. ही गोष्ट त्यांच्यासाठी खूप वेदनादायक होती. मी माझ्या मूळ धर्मात परतले आहे आणि माझ्या गावातील माझ्या समुदायातील सदस्यांसोबत मोठ्या आनंदाने आणि कोणत्याही निर्बंधाशिवाय सण साजरे करू शकते, ही माझ्यासाठी खूप आनंदाची गोष्ट आहे, असे या युवतीने सांगितले. घरवापसी कार्यक्रमाला केंदुझर येथील खासदारांचे स्थानिक प्रतिनिधी शिवेंद्र चक्र, धर्म जागरण समन्वय समितीचे ज्येष्ठ कार्यकर्ते शरत चंद्र स्वाई, प्रशांत चक्र, प्रशांत बिस्वाल, सामाजिक कार्यकर्ते अंजन बेहरा, हॅपी पात्रा, विकास चक्र, रवींद्र पटनायक आणि अन्य कार्यकर्ते उपस्थित होते. ●●

००००

# लखनौ : १५ जणांनी स्वीकारला हिंदू धर्म

**उत्तर प्रदेशची** राजधानी लखनौमधील गोमतीनगर भागात 'घरवापसी' कार्यक्रमात १५ जणांनी इस्लामचा त्याग करून पुन्हा आपला मूळ हिंदू धर्म स्वीकारला. विहिंपच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम गोमती नगरमधील शिव भोला मंदिर परिसरात झाला. या कार्यक्रमादरम्यान, वैदिक रीति-रिवाजांनुसार हवन-पूजन करण्यात आले. त्यानंतर स्वधर्मात परतलेल्यांना त्रिपुंड (पवित्र चिन्ह) लावून आणि भगवी वस्त्रे परिधान करून सन्मानित करण्यात आले.

धर्म परिवर्तन करणाऱ्या या लोकांनी व्यासपीठावरून जाहीरपणे मान्य केले की, काही वैयक्तिक कारणांमुळे किंवा लोभामुळे आपण इस्लाम धर्म स्वीकारला होता. तथापि, आता त्यांच्या स्वतःच्या आध्यात्मिक इच्छेने आणि सामाजिक जाणिवेने प्रेरित होऊन ते आपल्या मूळ धर्मात, सनातन हिंदू धर्मात परतत आहेत. घरवापसी करणाऱ्यांमध्ये पुरुष आणि महिलांचा समावेश होता. यात प्रामुख्याने मांडवी शर्मा, सोनू राणी, मालती, रीना, पल्लवी, हरजीत, संचित, राम नरेश मौर्य आणि नरेंद्र मिश्रा यांचा समावेश होता.

**लखनौच्या गोमतीनगरमध्ये विश्व हिंदू रक्षा परिषदेने 'घर वापसी' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात १५ जणांनी इस्लामचा त्याग करून पुन्हा हिंदू धर्म स्वीकारला. यावेळी वैदिक रीति-रिवाजांनुसार हवन-पूजन करण्यात आले. यानंतर धर्म परिवर्तन केलेल्यांना भगवी वस्त्र परिधान करून सन्मानित करण्यात आले. आम्ही वैयक्तिक कारणांसाठी इस्लाम स्वीकारल्याचे त्यांनी सांगितले.**

### सनातन परंपरेनुसार जगणार जीवन

आम्ही आता पूर्णपणे सनातन परंपरेनुसार जीवन जगू आणि हिंदू धर्माचे पालन करू, असे या सर्वांनी जाहीरपणे सांगितले. परिस्थिती किंवा प्रलोभनामुळे अन्य धर्म स्वीकारलेल्यांना त्यांच्या मूळ धर्मात परत आणणे हेच संघटनेचे उद्दिष्ट आहे, असे कार्यक्रमाचे नेतृत्व करणारे विश्व हिंदू रक्षा परिषदेचे प्रादेशिक समन्वयक पंडित आदित्यनाथ मिश्रा यांनी स्पष्ट केले.



'हे केवळ धर्म परिवर्तन नाही तर सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जागृती आहे. हिंदू धर्म संकुचित विचारसरणी मांडत नाही; उलट तो सहिष्णुता आणि ज्ञानाचे प्रतीक आहे. पुन्हा स्वधर्मात येऊ इच्छिणाऱ्यांचे आम्ही स्वागत करतो', असेही पंडित आदित्यनाथ मिश्रा यांनी सांगितले.

### मंदिरात झाली सामूहिक प्रार्थना

मंदिरात झालेल्या कार्यक्रमात मोठ्या संख्येने स्थानिक नागरिकही उपस्थित होते. उपस्थित सर्वांनी त्यांना फुले देऊन सन्मानित केले आणि त्यांना आलिंगन दिले. धार्मिक अनुष्ठानानंतर सर्वांना भगवद्गीता भेट म्हणून देण्यात आली. आम्हाला आता आमच्या जीवनात शांती आणि आत्मविश्वासाची अनुभूती येत आहे, असे हिंदू धर्मात परतणाऱ्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. ●●

(पांचजन्यवरून साभार)

## इतिहास

# कलचुरी; प्राचीन भारतातील पराक्रमी वंश

**'प्राचीन** भारतातील एक पराक्रमी व प्रसिद्ध वंश' अशी कलचुरी वंशाची ओळख आहे. उत्तर किंवा दक्षिण भारतातील कोणत्या ना कोणत्या प्रदेशावर ५५० पासून १७४० पर्यंत, म्हणजे जवळजवळ बाराशे वर्षे हा वंश राज्य करीत होता. त्यांच्या कोरीव लेखांवरून ह्या वंशाची बरीच माहिती ज्ञात होते. त्यांत या वंशाचे नाव कटच्चुरी, कटचुरि, कलचुरी, कालच्चुरि, कलतुर्य, कळचुर्य इत्यादी प्रकारांनी येते. नंतरच्या लेखांत हे राजे आपणास हैहय कार्तवीर्य सहस्रार्जुनाचे वंशज म्हणवू लागले. यांनी २४९-५० या वर्षात आरंभ होणाऱ्या संवताचा सर्वत्र उपयोग केल्यामुळे या संवताला पुढे 'कलचुरि-संवत' किंवा (यांच्या प्रदेशावरून) 'चेदि-संवत' असे नाव पडले, पण तो संवत त्यांचा नसून मूळचा आभीरांचा होता. कारण कलचुरी तिसऱ्या शतकात उदयास आले नव्हते.

पूर्वकालीन कलचुरी ५५० च्या सुमारास वाकाटकांनंतर उदयास आले. त्यांचा मूळपुरुष कृष्णराज (सु. ५५०-५७५) याने माहिष्मती (मध्य भारतातील महेश्वर) येथे आपली राजधानी करून आपली सत्ता मध्य भारत, गुजरात, कोकण, पश्चिम महाराष्ट्र व विदर्भ यांवर प्रस्थापित केली. त्याची चांदीची नाणी या सर्व प्रदेशांत सापडली आहेत.

कृष्णराजाचा पुत्र शंकरगण (सु. ५७५-६००)



आणि नातू बुद्धराज (सु. ६००-६२०) यांचे लेख गुजरात, महाराष्ट्र या प्रदेशांत सापडले आहेत. बादामीच्या मंगलेश या चालुक्य नृपतीने बुद्धराजाचा पराभव केला होता. पण त्याचे राज्य खालसा केले नव्हते. पुढे दुसऱ्या पुलकेशीने ६२० च्या सुमारास बुद्धराजाचा उच्छेद करून तो तीन महाराष्ट्रांचा स्वामी झाला. नंतर कलचुरींनी काही काळ चालुक्यांचे स्वामित्व स्वीकारले. बादामीच्या दुसऱ्या विक्रमादित्याने दोन हैहय राजकन्यांशी विवाह केले होते. त्या कलचुरी वंशीय असाव्यात. हे कलचुरी राजे शिवोपासक होते. त्यांचा पाशुपत आचार्यांना आश्रय होता. मुंबईजवळची घारापुरीची लेणी त्यांच्या आश्रयाखाली कोरली गेली, असे ऐतिहासिक संदर्भांवरून स्पष्ट होते. ●●

# अजिंठ्यात गांजा पकडला

तभा वृत्तसेवा

अजिंठा दि, १६ ऑक्टोंबर –येथील फुकटपुरा भागातील एका घरात अजिंठा पोलिसांनी बुधवारी (दि.१५) संध्याकाळी ६ वाजेच्या सुमारास टाकलेल्या धाडीत त्या महिलेच्या घरातून सुमारे तीस हजार रुपये किंमतीचा अडीच किलो गांजा अजिंठा पोलिसांनी जप्त केला असून महीले विरुध्द गुन्हा दाखल करून तिला अटक केली आहे.

पोलिसांन कडून मिळालेल्या माहिती नुसार अजिंठा येथील फुकटपुरा येथील एका घरातून गांजा विक्री होत असल्याच्या मिळालेल्या गोपनीय माहिती वरून अजिंठा पोलिस ठाण्याचे सपोनि अमोल ढाकणे,पोलिस उपनिरीक्षक रामेश्वर इंगळे,पोहेकॉ सांडू जाधव,संतोष पाईकराव,दिलीप तडवी,विजय पवार,अरुण गाडेकर,निलेश सिरस्कर,सागर फुलाने मपोकॉ सुरेखा काळे आदीच्या पथकाने बुधवारी संध्याकाळच्या सुमारास फुकट पुरा येथील जैतुनबी आमदखान मेवाती (७८) याच्या घराची झाडाझडती घेतली असता तिच्या घरात स्वतः आर्थिक फायदयासाठी विक्री साठी ठेवलेला सुमारे ३० हजार रुपये किंमतीचा २ किलो ५८८ ग्रॅम गांजा मिळून आल्याने ते जप्त करून वरील आरोपी विरुध्द सपोनि अमोल ढाकणे यांच्या फिर्यादी वरून अजिंठा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून तिला अटक करण्यात आली आहे.या प्रकरणी पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर इंगळे करीत आहे.

## बिगबास्केटने 10 मिनिटांत डिलिव्हरी सेवा सुरू

छत्रपती संभाजीनगर: टाटा एंटरप्राइझच्या बिगबास्केटने छत्रपती संभाजी नगरमध्ये त्यांची जलद डिलिव्हरी सेवा सुरू केली आहे, जी शहरातील खरेदी अनुभवात एक महत्त्वपूर्ण प्रगती आहे. बिगबास्केट छत्रपती संभाजी नगरच्या रहिवाशांना ताजे उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स आणि वैयक्तिक काळजीच्या आवश्यक वस्तूंसह १०,००० हून अधिक उत्पादनांची विविध निवड देते, जी सर्व प्रभावी १० मिनिटांत वितरित केली जातात. ही सेवा सोयीची पुनर्परिभाषा करण्यासाठी डिझाइन केली आहे, ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या घरातून अभूतपूर्व वेगाने किराणा सामान खरेदी करता येते. छत्रपती संभाजी नगर एक जलद गतीने शहरी केंद्र बनत असताना, त्याचे रहिवासी अधिकाधिक स्मार्ट आणि अधिक कार्यक्षम खरेदी उपाय शोधत आहेत. वेग, सुविधा आणि विश्वासार्हतेसाठी शहराची वाढती भूक बिगबास्केटच्या १० मिनिटांच्या डिलिव्हरी सेवेसाठी एक आदर्श लाँचपॅड बनवते. जीवनशैली वाढत असताना आणि डिजिटल स्वीकार वाढत असताना, हे वेळेवर लाँचिंग छत्रपती संभाजी नगरच्या बदलत्या ग्राहक सवयी आणि वाढत्या अपेक्षांशी पूर्णपणे सुसंगत आहे.

## आयोडीनबाबत जनजागृतीचे नेतृत्व टाटा सॉल्टकडे

छत्रपती संभाजीनगर:यंदाच्या जागतिक आयोडीन कमतरता दिनाच्या निमित्ताने, भारतातील आयोडीनयुक्त मिठाचा अग्रदूत आणि बाजारातील आघाडीचा ब्रँड टाटा सॉल्टने देशभरातील मुलांमधील आयोडीनच्या कमतरतेमुळे उद्भवणाऱ्या आजारांविरुद्ध (आयडीडी) लढा देण्याची आपली कटिबद्धता पुन्हा एकदा व्यक्त केली आहे. देशातील पहिले राष्ट्रीय पातळीवरचे आयोडीनयुक्त मीठ म्हणून, टाटा सॉल्ट हा ब्रँड लोकांमध्ये आयोडीन या सूक्ष्म पण अत्यावश्यक पोषक घटकाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे कार्य सातत्याने करीत आहे. विशेषतः बाल्यावस्थेतील बौद्धिक विकासासाठी आयोडीन हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने टाटा सॉल्टचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

## दिवाळीत आरोग्यदायी आहाराचे महत्त्व

स्वाती अवस्थी, मुख्य आहारतज्ज्ञ, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर

दीवाळी म्हणजे प्रकाशाचा सण, पण हा सण फक्त दिवे, फटाके आणि सजावटीपुरताच मर्यादित नाही, तर विविध स्वादिष्ट पदार्थांसह प्रेम आणि आनंद वाटण्याचा सण आहे. मिठाई, तळलेले पदार्थ आणि स्वादिष्ट जेवण हे या सणाचा महत्त्वाचा भाग आहेत. पण या उत्साहात जास्त खाल्ल्यामुळे आम्लता, अपचन आणि वजन वाढणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. या दीवाळीत, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूरच्या मुख्य आहारतज्ज्ञ स्वाती अवस्थी यांनी स्वाद आणि आनंद कायम ठेवत आरोग्यदायी पद्धतीने दीवाळी साजरी करण्यासाठी काही उपयुक्त टिप्स शेअर केल्या आहेत. मुख्य आहारतज्ज्ञ स्वाती अवस्थी म्हणतात, सणासुदीच्या खाण्यात लाडू किंवा समोसा खाणं सोडून द्यायचा नाही, फक्त ते योग्य प्रमाणात खायचा. योग्य प्रमाणात खाल्ल्याने तुम्ही सणातील सर्व गोड आणि स्वादिष्ट पदार्थांचा आनंद घेऊ शकता आणि तुमचं आरोग्यही टिकवू शकता.

## 'अर्था इंडिया व्हेंचर्स'कडून ५०० कोटी रुपयांचा 'अर्था व्हेंचर फंड-२' जाहीर

मुंबई : अर्था इंडिया व्हेंचर्स (एआयव्ही) या कंपनीने आज आपल्या दुसऱ्या मायक्रो व्हेंचर कॅपिटल फंडाच्या पहिल्या टप्प्याची घोषणा केली. 'अर्था व्हेंचर फंड-२ (एव्हीएफ-२)' या नावाच्या फंडाचा हा टप्पा २५० कोटी रुपयांचा आहे. फंडाचा एकूण आकार ५०० कोटी रुपये ठेवण्यात आला असून यामध्ये १०० कोटी रुपयांचा 'ग्रीन-शू' पर्यायदेखील देण्यात आला आहे. या फंडाने आधीच आपल्या उद्दिष्टाच्या ५० टक्क्यांहून अधिक कमिटमेंट्स मिळवल्या आहेत. त्यावरून अर्थाच्या गुंतवणूक धोरणावर आणि पूर्वीच्या यशस्वी कामगिरीवर गुंतवणूकदारांचा विश्वास असल्याचे स्पष्ट दिसते.

## 'सर्वात मोठे स्किनकेअर लाइव्हस्ट्रीम' म्हणून गिनिज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये केला विक्रम

मुंबई : डिकन्स्ट्रक्ट स्किनकेअर हा विज्ञानाधारित ब्रँड आपल्या 'अत्यंत परिणामकारक, तरीही मृदू' या तत्वासाठी ओळखला जातो. नुकत्याच पार पडलेल्या २४ तासांच्या डर्मेथॉन या पहिल्यावहिल्या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये 'सर्वात मोठे स्किनकेअर लाइव्हस्ट्रीम' म्हणून नवा विक्रम नोंदवला आहे.या मॅरेथॉन यूट्यूब लाइव्ह सत्रात देशभरातील २४ डर्मेटॉलॉजिस्ट आणि ३०,००० सहभागी यांचा समावेश होता. यातून ५००,०० हून अधिक रिअल टाईम संवाद साधले गेले. यात स्किनकेअरशी संबंधित २०,००० प्रश्न विचारले गेले आणि त्यातील १०,००० प्रश्नांना लाइव्ह उत्तरे दिली गेली. भारतातील स्किनकेअर उद्योगातील हा एक लक्षणीय टप्पा होता. २४ तासांचे लाइव्हस्ट्रीम यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड्सढच् तर्फे या उपक्रमाची अधिकृत नोंद करण्यात आली आहे.

## 'आय वॉन्ट टू टॉक', फक्त अॅन्डएक्सप्लोअर एचडीवर!

मुंबई, ऑक्टोबर २०२५: आपल्या अनरूटिन, अनएक्सपेक्टेड आणि अनफॉर्मुला सिनेमाच्या वचनाशी वचनबद्ध राहत अॅन्डएक्सप्लोअर एचडी घेऊन येत आहे शुजीत सरकार यांच्या प्रशंसनीय उत्कृष्ट कलाकृतीचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर – 'आय वॉन्ट टू टॉक' १९ ऑक्टोबर रोजी रात्री ९ वाजता. या चित्रपटात अभिषेक बच्चन यांनी साकारलेली प्रभावी आणि भावनिक भूमिका प्रेक्षकांच्या मनाला भिडणारी आहे. कथाकथनातील संवेदनशीलता आणि भावनांची खोली यासाठी या चित्रपटाचे सर्वत्र कौतुक झाले आहे.

## दियाच्या फटकळ आईच्या रूपात रितू वशिष्ठ वाढवते

सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेत अन्विता (सुंबुल तौकीर खान) आणि तिच्या भावंडांची गोष्ट आहे, जे सर्व मिळून आपले खडतर जीवन हिंमतीने, आशेने आणि चिवटपणे जगत आहेत. त्यांच्या वडिलांच्या सुहासच्या (वरुण बडोला) डोक्यावर कर्जांचे ओझे आहे आणि त्याने वारंवार घेतलेल्या चुकीच्या निर्णयांमुळे त्याच्या कुटुंबाची दुर्दशा झाली आहे. अशा परिस्थितीमुळे कुटुंबाचा भार अकाली अन्वितावर येऊन पडला आहे. प्रत्येक आव्हान पार करताना तिचा दृढनिश्चय आणि तिची लढण्याची जिद्द ही तिची ताकद बनते आणि त्याच्या बळावर ती आजवर आपल्या कुटुंबाला एकत्र ठेवण्यात यशस्वी झाली आहे. या कथानकात अलीकडेच जेष्ठ अभिनेत्री रितू वशिष्ठची एंट्री झाली आहे. ती फीबी फर्नांडिसची भूमिका करत आहे. फीबी ही अन्विताची खास मैत्रीण दिया (मनिका मेहरोत्रा) ची फटकळ आणि हेकेखोर स्वभावाची आई आहे. तिच्या आगमनामुळे या कथानकात एक गंमत आणि प्रत्यक्ष जगाचा दृष्टिकोन आला आहे.

# सेवा पंधरवड्यात आत्महत्याग्रस्त कुटुंबांना शासनाचा दिलासा

## ८४ कुटुंबांना दिवाळीपूर्वी किराणा किट वाटप

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१७ ऑक्टोबर – तालुक्यात सेवा पंधरवाडा उपक्रमांतर्गत नैसर्गिक आपत्तीग्रस्त तसेच शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांना मदतीचा हात देण्यात आला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून आणि उपविभागीय अधिकारी संतोष गोरडे यांच्या अध्यक्षतेखाली कन्नड येथे हा उपक्रम पार पडला.




या उपक्रमांतर्गत कन्नड व खुलताबाद तालुक्यातील ८४ आत्महत्याग्रस्त कुटुंबांना दिवाळी सणासाठी लागणाऱ्या किराणा व घरगुती वस्तूंच्या किटचे वाटप करण्यात आले. शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निवारण निधीतून या कुटुंबांना आधीच विविध आर्थिक सहकार्य मिळाले असून, दिवाळीच्या पार्श्वभूमीवर या कुटुंबांना भावनिक आधार देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील हा उपक्रम प्रथमच राबविण्यात आला असून, मराठवाडा ग्रामीण विकास संस्था व इतर सामाजिक संस्थांचे सहकार्य लाभले, असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले. किराणा किट मिळाल्याने आत्महत्याग्रस्त कुटुंबांना दिलासा मिळून अनेकांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

या वेळी जिल्हा नियोजन अधिकारी नितीन वायाळ, विभागीय पोलीस अधिकारी अपराजिता अग्निहोत्री, तहसीलदार विद्याचरण कडवकर, खुलताबाद तहसीलदार स्वरूप कंकाळ, तालुका कृषी अधिकारी संदीप शिरसाट, नायब तहसीलदार प्रशांत काळे, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी निलेश राठोड, सहाय्यक गटविकास अधिकारी विजयकुमार पंडित, गटशिक्षणाधिकारी मोहम्मद सभाहत, मंडळ अधिकारी रमेश चव्हाण व तलाठी दीपक एरंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# विश्व फाउंडेशन अक्कलकोट यांचे तर्फे सामूहिक अग्निहोत्र विधी संपन्न

संभाजीनगरच्या एन -३ सिडकोमधील सूर्यापार्क येथे आज दिनांक १७ ऑक्टोबर रोजी सकाळी सूर्योदयाच्या वेळी सामूहिक अग्निहोत्र विधी संपन्न झाला. या प्रसंगी विश्व फाउंडेशन, शिवपुरी , अक्कलकोट या वैश्विक संस्थेचे टीचर *श्री राहुलजी बियाणी* आणि अग्निहोत्राचे महत्त्व समजून सांगितले. अग्निहोत्र हा विधी वेदमधील मूळ यज्ञ असून प्रत्येक कुटुंबात होणे गरजेचे आहे किंबहुना ती आता काळाची



गरज आहे. वातावरणावरती उत्तम संस्कार आणि पर्यायाने त्या वातावरणात राहणाऱ्या प्रत्येकावर त्याचा सुपरिणाम हेच अग्निहोत्र हिलिंग सायकल आहे. वाढती धकाधकीचे जीवन शैली, त्यामुळे मन, शरीर यावरती येणारा ताण अग्निहोत्र मुळे कमी होण्यास मदत होते. संपूर्ण शहरामध्ये वेगवेगळ्या प्रसंगातून अग्निहोत्र या विषयी विश्व फाउंडेशन चे कार्यकर्ते माहिती देत असतात.

या प्रसंगी सूर्यप्रभात शाखेचे व शालिवाहन शाखेचे स्वयंसेवक, माननीय देवगिरी प्रांत संघचालक श्री अनिल भालेराव, सेवा भरती देवगिरी प्रांत अध्यक्ष श्री डॉ. सूर्यकांत शिरपेवार, श्री सारंग देवळाणकर, श्री गणपत कोनाळे, श्री सुधीर कोर्टीकर यांची प्रमुख उपस्थिती होती.त्याच बरोबर सूर्य प्रभात शाखेचे, शालिवाहन शाखेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच एन -३ , एन -४ सिडको मधिल महिला वर्गांची उपस्थिती लक्षणीय होती.

# आचार्य प्रणामसागरजी महाराज यांच्या हर घर भक्तांबर पदयात्रेस प्रारंभ

छ.संभाजीनगर प्रतिनिधी – श्री.१००८ खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे आचार्य प्रणामसागरजी महाराज यांचा चातुर्मास सुरै असुन आचार्यश्रीच्या सानिध्यात सकाळी शांतीनाथांचा पंचामृत अभिषेक व शांतीधारा संपुर्ण आचार्यश्रींचे हर घर भक्तांबर पदयात्रेस प्रारंभ करण्यात आले. हि पदयात्रा चौराहा, राजाबजार, जाफरगेट मार्गाने रोकडा हनुमान कॉलनी येथे विसर्जीत करण्यात आली. यावेळी पदयात्रेत भाविकांनी आचार्यश्रींचे दुध व पाण्याने पादपक्षालन केले व पुष्पवृष्टी करण्यात आली. पदयात्रेत जाफर



गेट येथे प्रसन्न आराधना येथे आचार्य प्रसन्नसागरजी महाराज लिखीत अंतर्मना उवाच हे पुस्तक पियुष कासलीवाल परिवारा तर्फे भेट देण्यात आले.

यावेळी पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, प्रमोद पांडे, प्रकाश कासलीवाल, नरेद्र अजमेरा, सनदकुमार साहुजी, पियुष कासलीवाल, अनिल कासलीवाल,सगिता कासलीवाल संजय मुथा, चंदा कासलीवाल, किर्ती कासलीवाल, कीरन गगवाल नयना अजमेरा, संजय मुथा, पंकज पाटणी, कल्याणी पाटणी, महावीर ठोले, राजकुमार पांडे, जिवन पाटणी, प्रेमचंद पाटणी,योगेश गंगवाल,प्रिती गंगवाल,सपना छाबडा,शोभा ठोले,भरत ठोले,स्नेहल ठोले,विनोद जाजु, रयनमंजुषा साहुजी, यांच्यासह समाज बांधवांची मोठया संख्येने उपस्थिती होती तदनंतर रोकडा हनुमान कॉलनी येथील प्रमोद पांडे यांच्या निवासस्थानी आचार्यश्रींचे आहारचर्या होउैन संध्याकाळी आनंदयात्रा होउैन सायंकाळी आरतीने कार्यकमाची सांगता करण्यात आली.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपा मराठवाडा विभागाची आढावा बैठक संपन्न

छत्रपती संभाजीनगर : भारतीय जनता पार्टी महाराष्ट्रच्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठवाडा विभागाची आढावा बैठक प्रदेशाध्यक्ष ना.रविंद्रजी चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मराठवाडा स्तरीय निवडणुकी संदर्भात महत्वाची बैठक पार पडली. . या वेळी कॅबिनेट मंत्री अतुल सावे , खा. डॉ. भागवत कराड, भाजपचे प्रदेश महामंत्री विक्रांत पाटील, भाजपाचे आमदार




व महामंत्री संजय केनेकर,संजय घोडके, त्याचप्रमाणे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे शहरअध्यक्ष किशोर शितोळे यांच्यासह सर्व पद प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत आगामी निवडणुकांसाठीची रणनिती, संघटनात्मक बळकटीकरण आणि कार्यकर्त्यांच्या भूमिकेबाबत सविस्तर चर्चा झाली. बैठकीस प्रमुख उपस्थिती भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते, प्रदेश पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, तसेच मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची होती. या वेळी नेत्यांनी स्थानिक पातळीवरील जनसंपर्क वाढविणे, विकासकामे जनतेप पर्यंत पोहोचविणे आणि आगामी निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांना सज्ज ठेवण्याचे आवाहन केले.बैठकीचे मार्गदर्शन वरिष्ठ नेत्यांनी करताना पक्षशिस्त, संघटनशक्ती आणि जनआधार वाढविण्यावर भर देण्यात आला. या बैठकीला मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमधून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# नगराध्यक्ष पदासाठी विद्या भूषण कावसणकर यांची उमेदवारी निश्चित

तभा वृत्तसेवा

पैठण दि १७ :- यंदाचे पैठण नगर परिषदेचे नगराध्यक्षपद हे सर्वसाधरण महिलासाठी राखीव झाल्याने महायुतीकडून आर्धा डझन ईच्छुकांपैकी विद्या भुषण कावसनकर यांची उमेदवारी १०० % निश्चित झाल्याचे वृत्त हाती आले असुन या ठिकाणी महायुतीच्या शिंदे सेना विरुध्द भाजपा अशी मैत्रिपुर्ण लढत होण्याची शक्यता आहे.

महायुतीत नगराध्यक्षपदासाठी माजी नगराध्यक्ष सोमनाथ परदेशी यांच्या सुनबाई वैशाली ईश्वर परदेशी, किशोर तावरे यांची भावजय सोनाली तावरे, शहर प्रमुख तुषार पाटील यांच्या सुविद्य पत्नी स्वाती तुषार पाटील व माजी नगरसेवक भुषण कावसनकर यांच्या पत्नी विद्या भुषण कावसनकर या चौघीजनी या पदासाठी प्रबळ दावेदार होत्या, या चौघांमध्ये विद्या कावसनकर यांची उमेदवारी निश्चित झाल्याचे वृत्त हाती आले आहे.



भुषण कावसणकर हे खा. संदीपान भुमरेंसह आ. विलास भुमरे यांचे अत्यंत निकटवर्तीय मानले जाते, भुमरे पितापुत्रांचे ते अत्यंत विश्वासु असे असुन त्यांचा नगरसेवक व स्वच्छता सभापती म्हणुन शहरात त्यांचे नाव आहे, त्यांच्या सुविद्य पत्नी विद्या कावसनकर यांची उमेदवारी आज जरी जाहीर झाली नसली तरी त्यांची उमेदवारी निश्चित झाल्याचे खात्रीलायक वृत्त आहे, आणि लवकरच या खात्रीलायक वृत्ताला शिंदे गटाकडून दुजोरा मिळण्याची दाट शक्यता आहे, विद्या कावसनकर यांना शिंदे गटाकडून उमेदवारी मिळाल्यास पैठणमध्ये भाजप सेना मैत्रिपुर्ण लढत अटळ आहे, भाजपाकडून माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे यांच्या पत्नी मोहीनी लोळगे यांची उमेदवारी जवळपास निश्चितच समजली जाते.

## पूर्णपणे नवीन स्कोडा ऑक्टाव्हिया आरएस: पॉवर, स्टाइल आणि लेगसी

छत्रपती संभाजीनगर, १७ ऑक्टोबर २०२५ : स्कोडा ऑटो इंडिया देशातील आपल्या प्रवासाची २५ वर्षे साजरी करत असताना, खऱ्या अर्थाने एका आख्यायिकेचे, म्हणजेच पूर्णपणे नवीन ऑक्टाव्हिया आरएस चे पुनरागमन होत आहे. मर्यादित संख्येत पूर्णपणे-निर्मित युनिट (एफबीयु) म्हणून उपलब्ध असलेली, ऑक्टाव्हिया आरएस ही अतुलनीय ड्रायव्हिंग गतिशीलता, धाडसी डिझाइन आणि निर्विवाद आरएस स्पिरीटचे प्रतीक आहे, ज्यामुळे उत्साही आणि शुद्धतातेसाठी एक खास आयकॉन म्हणून त्याचे भारतात पुनरागमन होत आहे. ऑक्टाव्हिया




आरएस ची ( (एक्स-शोरूम) किमंत ४९,९९,००० रुपये आहे.. ऑक्टाव्हिया आरएस ही मॅम्बा ग्रीन, कँडी व्हाइट, रेस ब्लू, मॅजिक ब्लॅक आणि वेल्वेट रेड या पाच आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध असुन गाडीची डिलिव्हरी ६ नोव्हेंबरपासून ग्राहकांना देण्यात येतील. ऑक्टाव्हिया आरएस मध्ये स्कोडा च्या नवीनतम एडीएएस सूटचा समावेश आहे, ज्यामध्ये अॅडॉप्टिव्ह क्रूझ कंट्रोल (एसीसी), ऑटोनॉमस इमर्जन्सी ब्रेकिंग (एइबी), लेन असिस्ट आणि इंटेलिजेंट पार्क असिस्ट यांचा समावेश आहे.

# नगर अर्बनच्या ठेवीदारांना ६५ टक्के रकमा परत

## अवसायक गणेश गायकवाड यांची माहिती

अ. नगर : भारतीय रिझर्व बँकेने नगर अर्बन को- ऑपरेटिव्ह बँकेचा परवाना ४ ऑक्टोबर २०२३ रोजी रद्द केला होता. गेल्या दोन वर्षाच्या काळात थकीत कर्जाची वसुली प्रक्रिया वेगाने राबवून १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत २२१५ ठेवीदारांच्या ६५ टक्के रकमा परत करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित ३५ टक्के रकमा परत करण्याचे नियोजन सुरू असून या रकमादेखील लवकरच परत करण्यात येणार असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली. बँकेचा बँकिंग परवाना रद्द झाल्यानंतर बँकेच्या दैनंदिन खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने भाडेतत्त्वावर शाखा कार्यालय असलेल्या बँकेच्या सर्व शाखा बंद करण्याचा निर्णय बँक प्रशासनाने घेतला. त्याचबरोबर स्वमालकीचे कार्यालय असलेल्या शाखा बंद करून त्यांचे कामकाज मुख्य शाखेत वर्ग करण्यात आले. त्यामुळे बँकेच्या दैनंदिन खर्चात मोठ्या प्रमाणात बचत झाली. याचबरोबर थकीत कर्जदारांकडील कर्ज वसुली, तारण मालमत्ता ताब्यात घेऊन त्यांचा लिलाव आदी प्रक्रिया वेगवान करण्यात आली होती. त्यामुळे जुलै २०२५ अखेर २२१५ ठेवीदारांना ५० टक्के रक्कम – ९६१६.०३ लाख रुपये तर १५ ऑक्टोबर २०२५ पर्यंत १५ टक्के रक्कम – २८८४. ६३ रुपये परत करण्यात आले आहेत. ज्या खातेदारांनी आपली केवायसी कागदपत्रे अद्याप बँकेकडे जमा केलेली नाहीत त्यांनी तात्काळ ही कागदपत्रे आपल्या नजीकच्या शाखेत अथवा मुख्यालयात जमा करावीत. याचबरोबर थकीत कर्जदारांनी आपली थकबाकी रक्कम तात्काळ बँकेकडे भरून प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी केले आहे.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे वाचन प्रेरणा दिन साजरा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१७ ऑक्टोबर – संत ज्ञानेश्वर महाविद्यालय ग्रंथालय विभाग वाचन प्रेरणा दिन दि.१५ बुधवार रोजी रोजी माजी राष्ट्रपती, शास्त्रज्ञ आणि भारतरत्न स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला.या निमित्ताने ग्रंथालय विभागात ११ वाजता कार्यक्रम आयोजित करण्यात आला.याकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार उपस्थित होते.तसेच कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ.निलेश गावडे,कै.बाबुरावजी काळे स्कूलच्या शिक्षिका मनीषा पाटील,योगेश काळे,ग्रंथपाल एन.जी.बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाची सुरुवात डॉक्टर अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.प्रमुख वक्ते डॉ.निलेश गावडे यांनी भारत २०२० या ग्रंथा विषयी विद्यार्थ्यांना माहिती सांगितली.ग्रंथपाल यांनी ग्रंथालयातील संग्रहाविषयी संपूर्ण माहिती दिली.वाचन प्रेरणा दिना निमित्ताने कै.बाबुरावजी काळे स्कूलच्या सहलीचे आयोजन करण्यात आले.या सहलीत शाळेचे १२ शिक्षिका ४० विद्यार्थ्यांचा समावेश होता. तसेच प्राध्यापक, प्राध्यापके तर कर्मचारी ग्रंथालयकर्मचारी आणि संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

## बिडकीन येथील ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये दीपावली सण साजरा

बिडकीन दि १७ ऑक्टोबर

पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लू व्हॅली इंग्लिश स्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही दीपावली सण मोठ्या आनंदात व उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला आणि मुख्याध्यापिका सविता तोतला यांच्या हस्ते लक्ष्मीमातेच्या पूजनाने करण्यात आली. शाळेचा परिसर रंगीबेरंगी रांगोळ्यांनी व आकर्षक दिव्यांनी सजवण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी पारंपरिक पोशाखात मनमोहक नृत्य सादर केले. यावेळी शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला व मुख्याध्यापिका सविता तोतला यांनी विद्यार्थ्यांना दीपावली सण साजरा करताना सुरक्षिततेची काळजी घेण्याचा संदेश दिला. विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात फटाके फोडत सणाचा आनंद लुटला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील सर्व शिक्षकवृंद आणि कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. दीपावली निमित्त संपूर्ण शाळा एकत्र येऊन सण साजरा करत आनंदाचा अनुभव घेतला.

## बिडकीन येथील ब्लू माउंटेन प्री-इंग्लिश स्कूलमध्ये दिपावली सण साजरा



बिडकीन दि १७ ऑक्टोबर पैठण तालुक्यातील बिडकीन येथील ब्लू माउंटेन प्री-इंग्लिश स्कूल येथे दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ रोजी दिपावली सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतीश तोतला आणि मुख्याध्यापिका. सविता तोतला यांच्या हस्ते पारंपरिक लक्ष्मी पूजनाने करण्यात आली. या विशेष दिवशी शाळेतील विद्यार्थी राम, सीता आणि लक्ष्मण यांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते. तसेच डठ घऋच्या विद्यार्थ्यांनी राम आएंगे या गाण्यावर सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमात सतीश तोतला व. सविता तोतला यांनी विद्यार्थ्यांना दिपावली सण साजरा करताना सुरक्षिततेचे भान ठेवण्याचा संदेश दिला. शिक्षिका रेखा चव्हाण यांनीही आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना सणाचे महत्त्व पटवून दिले.कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी शाळेच्या परिसरात फटाके फोडून आणि आनंद साजरा करत दिपावलीचा आनंद द्विगुणीत केला. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या शिक्षिका प्रतीक्षा पोटे, मनिषा जाधव, नंदिनी चव्हाण, रेखा चव्हाण, ज्योती राठोड, कविता मढीकर तसेच शाळेतील इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## कार्यालय
## मुदखेड नगरपरिषद, जि. नांदेड

### निविदा सुचना

सर्व पुरवठादार, आस्थापनां धारकांस याव्दारे सुचित करण्यात येते की, मुख्याधिकारी नगर परिषद मुदखेड जि. नांदेड यांचेकडून मुदखेड नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता छपाई तसेच स्टेशनरी साहित्य पुरवठा करणेसाठी दरपत्रक मागविण्यता येत आहेत. तरी इच्छुक पुरवठा धारकांनी आपले उपरोक्त बार्बीचे दरपत्रक सिलबंद पाकिटात दिनांक २५.१०.२०२५ दुपारी ०५.०० वा. पर्यंत कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळुन मुख्याधिकारी यांचेकडे दाखल करावेत. तसेच या संदर्भातील अटी व शर्ती तथा आवश्यक ती माहिती मुदखेड नगरपरिषदेच्या निवडणूक विभागात कार्यालयीन वेळेत सुटीचे दिवस वगळून पहावयास मिळतील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मुख्याधिकारी नगरपरिषद गुदखेड यांनी राखुन ठेवला आहे.

**मुख्याधिकारी**
नगरपरिषद मुदखेड जि.नांदेड

## अग्रलेख...

# नकाराचे नगारे

महाराष्ट्रात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधी प्रचाराच्या तुताऱ्या वाजण्याऐवजी राजकारणाचे काही वेगळेच सूर राज्यात घुमू लागले आहेत. मुळात या निवडणुकांची मुदत संपून सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार प्रशासकाच्या हाती सोपविला गेला; त्यालाही आता काही वर्षे, कित्येक महिने उलटून गेली आहेत. आता आणखी विलंब न होता, लोकशाही तत्त्वानुसार जनतेने जनतेसाठी जनतेचा कारभार हाताळावा याकरिता त्या पार पडाव्यात, अशीच सर्वांची इच्छा असताना काही नव्या हालचालींचे संकेत मिळू लागले आहेत. ओबीसी आरक्षणाचा तिढा हे राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडण्याचे मुख्य कारण आहे, ही बाब स्पष्ट झालेली आहे.

मार्च २०२२ च्या पहिल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील मागासवर्ग आयोगाच्या अंतरिम अहवालावर अवलंबून न राहण्याचा सल्ला राज्य निवडणूक आयोगास दिला होता, हे त्यावेळी स्पष्ट झाले होते. गेल्या मंगळवारी आणि लागोपाठ त्यानंतरच्या दुसऱ्या दिवशी केंद्रीय निवडणूक आयोगाचे महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिकारी व राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त या दोघांचीही भेट घेणाऱ्या महाविकास आघाडी सरकारच्या काळातच, ओबीसी आरक्षणासाठी तयार करण्यात आलेला अहवाल अपूर्ण असल्याने निवडणूक प्रक्रियेस खीळ बसली होती, हेही स्पष्ट झाले आहे. त्या अहवालात संशोधनाचा आणि राज्यातील ओबीसी समाजाच्या स्थितीच्या अभ्यासाचाही अभाव होता. तिकडे मध्य प्रदेश सरकारने मागासवर्ग आयोग स्थापन केला, तिहेरी चाचणीच्या तत्त्वानुसार कार्यवाही केली, इम्पिरिकल डेटा तयार करून न्यायालयात सादर केला आणि मध्य प्रदेशला ओबीसी आरक्षणाची मंजुरी मिळाली. महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारने तिहेरी चाचणीची पूर्तता करण्याबाबत कानाडोळा केला नसता, राजकीय आरक्षणाचा योग्य तपशील न्यायालयास सादर केला असता, तर महाराष्ट्रातही ओबीसी आरक्षणाचा मुद्दा एखाद्या तिढ्यासारखा जटिल होऊन राहिला नसता. पण ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी तयार केलेल्या अहवालात त्रुटी राहिल्या, पुरेसे संशोधन झाले नाही, असा ठपका ठेवून सर्वोच्च न्यायालयानेच आरक्षण नाकारले होते. ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणात अडथळे आणण्याचा प्रयत्न महाविकास आघाडी सरकार करीत असल्याचा आरोप तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केला होता. सन २०१९ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने एका प्रकरणात ट्रिपल टेस्ट, म्हणजे तिहेरी चाचणीचा मुद्दा प्रथम अधोरेखित केला होता. त्यासंबंधीचे आदेश दिले होते. ती प्रक्रिया पूर्ण केल्याखेरीज ओबीसी आरक्षण पूर्ववत होणार नाही, हेही तेव्हाच स्पष्ट झाले होते. मात्र, या कामात सरकारी स्तरावर प्रचंड गोंधळ पाहावयास मिळाला. ओबीसी आरक्षणासाठी मागासवर्ग आयोग स्थापन करून इम्पिरिकल डेटा तयार करण्याची सूचना सर्वोच्च न्यायालयाने महाविकास आघाडी सरकारला केली होती. अगोदरच्या सत्ताकाळात फडणवीस सरकारने लागू केलेले आरक्षणही संपले. न्यायालयाच्या सूचनेनुसार कार्यवाही करण्याऐवजी न्यायालयात केवळ फेरविचार याचिका दाखल केली गेली. ओबीसी समाजाच्या राजकीय आरक्षणासंदर्भात सुरू असलेल्या सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या प्रक्रियेदरम्यान राज्य सरकारने १५ महिन्यांत तब्बल आठ वेळा केवळ पुढच्या तारखा मागितल्या आणि बेफिकीर मानसिकतेमुळे ओबीसी आरक्षणात धक्का लागल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची संपूर्ण प्रक्रिया रखडली. आता पुन्हा निवडणुका पुढे ढकलण्यासाठी नवे कारण पुढे करणे म्हणजे राजकीय क्षेत्रात शिरकाव करू पाहणाऱ्यांच्या उमेदीचा विरस करण्यासारखे ठरेल. त्यामुळे मतदार याद्यांच्या मुद्यावर निवडणुकांची प्रक्रिया रोखण्याऐवजी, सरकार व निवडणूक यंत्रणेस संपूर्ण सहकार्य करून पारदर्शक निवडणुका घेण्याकरिता एकत्रितपणे सहभाग नोंदविणे अधिक समंजसपणाचे ठरेल. तसे न करण्याचीच मानसिकता असेल, तर त्यामुळे जुन्या तिढ्याच्या गाठी अधिक घट्ट होण्याची शक्यता अधिक आहे, हे लक्षात घ्यावयास हवे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असताना नव्याने सुरू झालेल्या वादाच्या पृष्ठभूमीवर हा तिढ्याचा इतिहास लक्षात घ्यावयास हवा. मतदार याद्यांच्या व वोट चोरीच्या मुद्यावरून राहुल गांधी यांनी सुरू केलेल्या गदारोळाचे लोण महाराष्ट्रात पोहोचल्यावर मतदार याद्यांमधील दोष शोधून काढण्याकरिता काँग्रेसने माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली नियुक्त केलेल्या समितीने गेल्या चार महिन्यांत काय केले, त्यांच्या अभ्यासाचा किंवा पाहणीचा नेमका निष्कर्ष काय, त्याबाबतचा अहवाल या समितीने पक्षाकडे सादर केला आहे का, हेही स्पष्ट झालेले नाही. ही समिती आपला अहवाल प्रदेश काँग्रेसला सादर करेल, असे पक्षाने जाहीर केले होते. तसा अहवाल तयार किंवा सादर झाला असता, तर याद्यांवरील ताज्या आक्षेपांचे काही ठोस पुरावे आयोगासमोर सादर करून मागणीस बळ देणे काँग्रेसला व महाविकास आघाडीला सहज शक्य झाले असते. मतदार याद्यांमधील दोष पुरेशा पुराव्यांनिशी निदर्शनास आणून द्यावेत, अशी आयोगाची भूमिका आहे. त्या त्रुटी दूर करून याद्या परिपूर्ण व निर्दोष करण्याची सर्वच राजकीय पक्षांची तयारीदेखील आहे. मात्र, या समितीने याबाबत नेमके काय केले, महाराष्ट्रातील मतदार याद्यांसंदर्भातील आरोपाबाबतचे पुरावे संबंधित आयोगास सादर केले किंवा नाही, याबाबतचा तपशील स्पष्ट झालेला नाही. त्यामुळे मतदार याद्या सदोष असल्याचा आक्षेप घेत केवळ जनतेच्या मनात संभ्रम निर्माण होण्याची व विरोधकांच्या हेतूविषयी शंका उपस्थित होण्याची शक्यताही अधिक आहे. म्हणूनच ज्या मुद्यावरून निवडणुका पुढे ढकलण्याच्या मागण्या महाविकास आघाडीकडून केल्या जात आहेत, त्या मुद्यांसाठी सज्जड पुरावे सादर करून दोष दाखवून देण्याची जबाबदारी आघाडीने घ्यावयास हवी.

मतदार याद्यांचे अद्ययावतीकरण ही एक सातत्यपूर्ण प्रक्रिया असते. यामध्ये नवीन मतदारांच्या नावांचा समावेश करणे, वगळणे, नावांची दुरुस्ती करणे अशा क्रिया सातत्याने सुरू असतात. लोकसभा निवडणुकीआधी, जानेवारी २०२४ मध्ये मतदार याद्यांच्या अंतिम प्रकाशनाचा मसुदा प्रकाशित झाला व त्यावर आक्षेप, दावे, प्रतिदावे नोंदविण्याची प्रक्रिया आयोगाने पार पाडली होती. ही प्रक्रियादेखील सर्वसाधारणपणे नियमित राबविली जात असते. त्यामुळे जुलै २०२४ मध्ये पात्र असलेल्या मतदारांचा या यादीत समावेश असेल, असा आयोगाचा कटाक्ष होता व लोकसभा निवडणुकीत तीच यादी वापरली गेली होती. त्याच याद्यांनुसार विधानसभा निवडणुकाही पार पडल्या. त्यानंतर विरोधकांनी मतदार याद्यांतील त्रुटींबाबत आक्षेप घेण्यास सुरुवात केली, असा आरोप केला जातो. ज्या याद्यांनुसार पार पडलेल्या लोकसभा निवडणुकांत महाविकास आघाडीला भरभरून यश मिळाले, त्याच याद्यांनुसार झालेल्या विधानसभा निवडणुकांत मात्र या आघाडीला फटका बसला आणि लगेचच याद्यांतील त्रुटींचा मुद्दा समोर आला, या योगायोगासही राजकीय झालर असल्याचा प्रतिपक्षाचा आक्षेप विरोधकांनी खोडून काढावयास हवा. ज्या मुद्यांवर विरोधकांनी आक्षेप घेतला, त्यावर आयोगाची भूमिका स्पष्ट झाली आहे. या याद्यांचा मसुदा आणि अंतिम याद्या मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना विनामूल्य पुरविल्या जात असल्याने, विहित कालावधीत त्यावरील आक्षेप नोंदविण्याची संपूर्ण मुभा विरोधकांसही असते. काँग्रेसकडूनही दोन वेळा अशा दोन्ही याद्यांची मागणी केली गेली व त्या याद्या पुरविल्या गेल्या, असे निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आल्याच्या बातम्या प्रसिद्ध झाल्या आहेत. म्हणूनच आता त्या मुदतीनंतर नव्या निवडणुकांची प्रक्रिया सुरू होत असताना, जुन्या आक्षेपांचे वादळ माजविताना विरोधकांनी त्यांची भूमिका जबाबदारीपूर्वक जनतेस पटवून द्यावयास हवी. मतदार याद्यांच्या शुद्धीकरणाची व विशेष परीक्षण मोहिमांची प्रक्रिया थांबवावी, अशी विरोधकांची राष्ट्रीय पातळीवर भूमिका असल्याचेही दिसते. महाराष्ट्रात याबाबत विरोधकांचे काय मत आहे, हेही स्पष्ट व्हावयास हवे. अन्यथा, अगोदरच दीर्घकाळ रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा केवळ राजकारणापायी खेळखंडोबा व्हावा आणि लोकशाहीस अपेक्षित असलेल्या कारभाराची घडी विस्कटावी, हे महाराष्ट्रास शोभादायक ठरणार नाही. मतदार याद्यांमधील त्रुटी दूर करण्याची एक विहित प्रक्रिया आहे आणि त्यामध्ये सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांचा सहभाग अपेक्षितही आहे. त्या प्रक्रियेच्या चौकटीत राहून तसे करणे हा लोकशाहीचा आणि संविधानाचा आदर ठरेल. ▮

---

## दखल

# बांबू : बासरीपासून तिरडीपर्यंत खूप काही..

**अनिरुद्ध पांडे**

'बांबू' हा शब्द ऐकताच मराठीतही तितकाच सहजपणे वापरला जाणारा 'वेळू' हा पर्यायी संस्कृत शब्द आठवतो. सोबतच बांबूपासूनच तयार होणाऱ्या 'बासरी'पासून तर 'बांबू हाऊस' म्हणजे बंगल्यापर्यंत अनेक वस्तू आठवतात. चटई, टोपल्या, आणखी वाद्यप्रकार, हस्तकला, दिवे, कंदील, मांडव, कुंपण, फर्निचर, कागद आणि 'तिरडी'पर्यंत खूप काही आठवून जाते. पिवळा, हिरवा, टणक आणि वेगाने वाढणारा एक वनस्पतीचा प्रकार डोळ्यांसमोर येतो. भारतात बांबूचा वापर पारंपरिक जीवनशैलीपासून ते आधुनिक बांधकाम आणि हस्तकलेपर्यंत होत आलेला आहे.

महाराष्ट्रातील आदिवासी, ग्रामीण भागातील लोकांसाठी बांबू हे केवळ एक झाड नसून उपजीविकेचे महत्त्वाचे साधन आहे. महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेले नवे बांबू धोरण हे कृषी, पर्यावरण आणि उद्योग क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. राज्य सरकारने बांबूचे वाढते महत्त्व ओळखून नवीन बांबू धोरण जाहीर केले. या धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे राज्यातील बांबू उत्पादन वाढवणे, त्यातून उपजीविकेच्या संधी निर्माण करणे आणि बांबू आधारित उद्योगांना चालना देणे, हे आहे. अनेक वर्षांपासून भारतात बांबूला 'झाड' न मानता 'वृक्ष' मानले जात होते. २०१७ मध्ये केंद्र सरकारने बांबूला 'गवत' मानले आणि जंगल कायद्यातून वगळले. महाराष्ट्र सरकारने हेच धोरण राज्यात प्रभावीपणे लागू केले आहे, त्यामुळे आता शेतकऱ्यांना बांबू लागवडीसाठी वनपरवानगी घ्यावी लागत नाही. धोरणांतर्गत ग्रामीण भागात बांबू क्लस्टर तयार करण्यात येणार आहेत.

भारतात बांबूचा वापर प्राचीन काळापासून होत आला आहे. रामायण आणि महाभारत या महाकाव्यांमध्येही बांबूचा उल्लेख आढळतो. आदिवासी जमाती बांबूपासून घरांची छपरे, भांडी, हत्यारे, वाद्ये आणि इतर वस्तू तयार करत. तसेच भारतीय संगीत क्षेत्रात बासरी म्हणजेच बांबूपासून तयार केलेले वाद्य आजही प्रमुख वाद्यांपैकी एक आहे. भारतात हजारो वर्षांपासून बांबूचा औषधी उपयोगही केला जात आहे. बांबू ही बहुगुणी वनस्पती असून तिचा उपयोग अनेक प्रकारे होतो आयुर्वेदात बांबू मन्ना (बांबूसिलिका) चा वापर हाडे बळकट करण्यासाठी आणि विविध त्वचारोगांवर केला जातो. बांबू हलका, मजबूत आणि लवचीक असतो. त्यामुळे पर्यावरणस्नेही बांधकामासाठी बांबू उपयुक्त मानला जातो. ग्रामीण भागात तर बांबूचे घर, कुंपण, छप्पर वापरले जातातच; शहरी भागातही 'बांबू आर्किटेक्चर'चा उपयोग होतो आहे. घरेच नाहीत तर, हॉटेल्स आणि दुमजली बंगलेसुद्धा जगाच्या पाठीवर आपण बघू शकतो. बांबूपासून प्लायवुड, फर्निचर, सजावटीच्या वस्तू, कागद, बायोडिग्रेडेबल स्ट्रॉ, टूथब्रश आणि आता तर कापडसुद्धा बनवले जाते. यामुळे प्लॅस्टिकच्या पर्यायाची निर्मिती शक्य होते.

बांबूपासून 'बायोचार' आणि 'बायोमास' ऊर्जा तयार केली जाते. हा हरित ऊर्जेचा एक पर्याय आहे. बांबूची मुळे मृदसंधारणात मदत करतात. त्यामुळे शेताजवळ बांबू लागवड केल्यास जमिनीची झीज टाळता येते. मधमाशांसाठी बांबू आदर्श वनस्पती आहे, त्यामुळे मधुमक्षिकापालन आणि मधनिर्मितीसुद्धा वाढू शकते. कोकण, विदर्भ आणि मराठवाडा भागांत अनेक महिला बचतगट बांबूपासून कुटीर उद्योग चालवतात. टोपल्या, मातीसाठी फळकूट, कंगवे, फण्या, खुरप्या, शोभेच्या वस्तू बनविल्या जातात. बांबूपासून सूत तयार केले जाते, ज्याला 'बांबू फॅब्रिक' म्हणतात. हे फॅब्रिक सुती कापडासारखे वाटते, पण अधिक टिकाऊ व निसर्गस्नेही असते. त्यामुळे इको-फ्रेंडली फॅशन ब्रॅण्ड्स बांबू कापडाचा वापर वाढवत आहेत.

बांबूचा वापर केवळ आर्थिकच नव्हे, तर पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा आहे. बांबू इतर झाडांपेक्षा अधिक प्रमाणात कार्बन डायऑक्साईड शोषून घेतो आणि ऑक्सिजन उत्सर्जित करतो. त्यामुळे शहरांमध्ये हरित पट्टे तयार करण्यासाठी बांबूचा चांगला उपयोग होतो. बांबूची मुळे माती धरून ठेवतात. त्यामुळे पाण्याचा साठा टिकून राहतो व भूजलपातळी वाढण्यास मदत होते. वणवे, पूर किंवा वाळवंटासारख्या जमिनींवर बांबूची लागवड केल्यास त्या भागाचे हरितीकरण शक्य होते. बांबू उद्योग हा श्रमप्रधान आहे. महाराष्ट्रात विशेषतः गडचिरोली, चंद्रपूर, नंदुरबार, गोंदिया, पालघर या जिल्ह्यांमध्ये आदिवासी भागातील लोकांसाठी बांबू आधारित उद्योग हा उपजीविकेचा मजबूत आधार ठरू शकतो. महिला बचतगट, युवक मंडळे यांना बांबूवर आधारित उद्योग विकसित करता येतात. चीन हा बांबू क्षेत्रातील जागतिक अग्रणी देश आहे. सुमारे ७० टक्के जागतिक बाजारपेठ चीनच्या ताब्यात आहे. भारत या क्षेत्रात तिसऱ्या क्रमांकावर आहे, पण निर्यातीत अजूनही वाटा फक्त ४ टक्के आहे. महाराष्ट्र, कर्नाटक आणि ईशान्य भारतात योग्य धोरण व संशोधन अवलंबिल्यास भारताची या क्षेत्रात 'ग्लोबल प्लेयर' बनण्याची क्षमता आहे. चीनमध्ये बांबू उत्पादन व प्रक्रिया तंत्रज्ञान विकसित असून बांबू कापड, फर्निचर, पेपर, बांबू-प्लाय यात ते आघाडीवर आहेत. जागतिक बाजारपेठेचा अंदाज आहे की २०३० पर्यंत बांबूबाजार ८८.४४ बिलियन्स अमेरिकी डॉलर्सपर्यंत जाऊ शकतो. या देशांनी दाखवून दिले आहे की, बांबू आज केवळ पारंपरिक वापरापुरता मर्यादित नाही तर नवे उद्योग, टिकाऊ वास्तुकला, पर्यावरण विज्ञान, जैविक सामग्री आणि आर्थिक विकास या सर्व क्षेत्रांत तो वाढला आहे. भारत हा जगातील दुसरा सर्वांत मोठा बांबू उत्पादक देश आहे. ज्यात ईशान्य भारत, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, छत्तीसगड, ओरिसा आणि कर्नाटक या राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बांबू आहे. वनखात्याच्या २०२३ च्या अहवालानुसार भारतातील एकूण बांबू क्षेत्रफळ अंदाजे १५ दशलक्ष हेक्टर आहे. महाराष्ट्रातील पूर्व भाग, विशेषतः विदर्भ आणि काही आदिवासी जिल्हे बांबूच्या नैसर्गिक साठ्यांसाठी प्रसिद्ध आहेत. त्यात जिल्हानिहाय बांबू उत्पादन, मेट्रिक टनात आणि प्रतीवर्ष यांचे उत्पादन पाहिल्यास त्यात पाचपैकी चार जिल्हे विदर्भातील आहेत. सरकारी आकडेवारीनुसार आणि सर्वसाधारण अपेक्षेनुसार गडचिरोली ८० हजार आणि चंद्रपूर ६० हजार हे जिल्हे अव्वल आहेत. त्यानंतर गोंदिया ४५ हजार, नंदुरबार ३० हजार आणि यवतमाळ २५ हजार असे यांचे मेट्रिक टन उत्पादन आहे. या उत्पादनाची व्याप्ती पाहता, बांबू प्रक्रिया उद्योग महाराष्ट्रात ग्रामीण आर्थिक विकासासाठी वरदान ठरू शकतो. महाराष्ट्रात सध्या सुमारे ९.४७ लाख टन बांबू उत्पादन होते. राज्यातील सुमारे १.५० लाख हेक्टर जमीन बांबू लागवडीखाली आहे. बांबू धोरणासाठी पुढील दहा वर्षांत सुमारे ५०,००० कोटी रुपये गुंतवणूक आणि सरकारी निधी व इतर सहायता योजना समाविष्ट करण्यात आल्या आहेत. या धोरणाचा उद्देश थेट व अप्रत्यक्ष दोन्ही प्रकारच्या ५ लाखांपेक्षा जास्त रोजगारनिर्मिती करण्याचा आहे. १५ ठिकाणी विविध सुविधा बांबू क्लस्टर्स, दुर्गम भागात सामान्य सुविधा केंद्रे, कृषी विद्यापीठांमध्ये संशोधन व प्रशिक्षण यांचा समावेश या धोरणात आहे. बघूया, हे सारे प्रत्यक्षात उतरल्यास बांबू, बांबूचे बन आपल्या युवा पर्यटकांना अधिक आकर्षक असे ठरू शकणार आहे. ▮

९८८१७१७८२९

---

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# नियतीचा 'जुगाड'

'जुगाड' हा शब्द समस्त भारतीयांना प्रिय आहे. दैनंदिन व्यवहारांपासून ते कार्यालयीन कामकाजापर्यंत प्रत्येक बाबतीत 'जुगाड' करण्यात आपण अव्वल आहोत. विशेषत: गाड्या घेताना, वाहतुकीचे नियम पाळताना अगदी साधं हेल्मेट घालण्यातही जुगाड शोधणारी आपली जमात! चांगल्या दणकट हेल्मेटऐवजी फायबरची टोपली हेल्मेट म्हणून घालताना, आपलाच जीव धोक्यात असतो. राजस्थानच्या जैसलमेरमधून एसी बसच्या थंडाव्यात निघालेल्या प्रवाशांच्या बाबतीतही असेच झाले. फक्त इतरांनी फायद्यासाठी केलेला 'जुगाड' त्यांची चिता रचणारा ठरला. एकूण ५७ प्रवाशांना घेऊन जोधपूरकडे निघालेली ही बस अलिकडेच सामान्य बसमधून एसी बसमध्ये रूपांतरित झाली होती. हे मॉडिफिकेशन 'जुगाड' प्रकारात मोडणारे असल्यामुळे एसीमध्ये शॉर्ट सर्किट होऊन आग लागली. धूर आणि उष्णतेमुळे बसमधून बाहेर पडण्याची दारं आतून लॉक झाली आणि नंतरचा भीषण परिणाम आपण जाणतोच. बसला मॉडीफाय करून रस्त्यावर आणण्यासाठी काही नियम आहेत, कागदोपत्री कारवाई करावी लागते. नियमांनुसार स्लीपर बस टाईप-४ वर्गवारीत येते. आधी बसच्या चेसिसची खरेदी करून, त्यानुसार बसची बॉडी बनवावी लागते. त्यात बसमध्ये लागणाऱ्या सीट्स, त्यांची संख्या, डिझाईन आणि आकार महत्त्वाचा आहे.

इतकी प्रक्रिया झाली की, तीन तपास संस्थांकडून बसची पाहणी होते आणि बसच्या प्रकाराला मान्यता मिळते. मग बसला फिटनेसचे प्रमाणपत्र मिळते. ही प्रक्रिया बसची बॉडी बनविणाऱ्या व्यक्ती किंवा कंपनीला करावी लागते. पुन्हा एकदा बसची अंतिम तपासणी होऊन, बस रस्त्यावर आणण्यास मंजुरी मिळते.

कायदे आणि नियमांनुसार सगळं झालं तर काहीच अडचण नाही, पण ही सगळी प्रक्रिया किचकट, वेळखाऊ आणि तुलनेने महाग आहे. मग मदतीला धावून येतो 'जुगाड'! प्रस्थापित आणि मोठे बस बॉडी मेकर कार्यालयीन प्रक्रिया पूर्ण करतात. या व्यवसायात अननुभवी, गुंतवणूक करू न शकणाऱ्या, तांत्रिक बाबींचे ज्ञान नसलेल्या बॉडी मेकिंग मेकॅनिककडून बस बनवून घेतात. त्यातही कागदोपत्री वेगळा साईज, डिझाईन, संख्या आणि प्रत्यक्षात बनते वेगळेच! म्हणजे मंजूर डिझाईन १३ आसन क्षमतेचे आणि बसमध्ये असतात १५, एक्सएल चेसिसवर डबल एक्सएल आकाराची बस बनवतात. बसमध्ये एसी लावताना फायर एक्झिटची व्यवस्था असायलाच हवी; पण जुगाड नियमांपेक्षा मोठा ठरतो. एका साध्या बसला मॉडीफाय करण्यासाठी एसीसह २५ लाखांपर्यंत खर्च येतो. यात चेसिस आणि टायरचा खर्च धरला जात नाही. कमी पैशांत 'लक्झरीयस' बस बनविताना सर्वात आधी सुरक्षेकडे दुर्लक्ष केले जाते. खालच्या दर्जाचे साहित्य आणि खराब वायरिंग म्हणजे 'उपर से टामटूम, अंदर की राम जाने!' या जुगाडातून हकनाक बळी तेवढे जातात. ईशान्येकडील राज्यांमध्ये विशेषत: नागालॅण्ड आणि अरुणाचल प्रदेशांत अशा बसेस 'बनवून' मिळतात. शिवाय, टॅक्स कमी लागतो. उदाहरणार्थ एखाद्याने राजस्थानात रजिस्ट्रेशन केले तर त्याला महिन्याला जवळपास ४८ हजार म्हणजे वर्षाचे जवळपास ६ लाख करापोटी द्यावे लागतात. ईशान्य राज्यांमध्ये रजिस्ट्रेशन केल्यास ही रक्कम थेट १० टक्क्यांनी कमी होते. एकदा नॅशनल परमिट मिळाले की, देशभरात कुठेही बस चालवता येते. आपल्या बुलढाण्याहून पुण्याकडे निघालेल्या बसचा कोळसा झाला आणि तीन चिमुकल्यांसह २५ जण जिवंत जळाले. इतके की, मृतदेह ओळखण्यासाठी डीएनए चाचणी करण्याची वेळ आली होती. बाकी देशभरात नियमितपणे अशी जळीतकांडं घडतात. चर्चा होऊन नवे नियम अंमलात येतात आणि सोबतच नवे जुगाडही! पण, नियतीचा 'जुगाड' वेगळाच असतो आणि तो आपल्या समजण्यापलीकडे असतो, हे मात्र नक्की! ▮

९८८१९०३७६५

---

## दखल

# काँग्रेसला मनसेची एलर्जी

**मोरेश्वर बडगे**

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे चुलत बंधू एकत्र येतील का? या प्रश्नाचे उत्तर मिळताना दिसत आहे. गेली काही दिवस या प्रश्नांची चर्चा आहे. मराठी आणि महाराष्ट्राच्या हिताच्या मुद्यावर आपण एकत्र यायला तयार आहोत, असे राज ठाकरे यांनी एका मुलाखतीत सांगितले आणि हा विषय सुरू झाला. महाराष्ट्राच्या हिताच्या मुद्यावर आपण एक आहोत, असे उद्धव ठाकरे म्हणाले आणि हा विषय वाढला. याच काळात फडणवीस सरकारने हिंदी सक्तीचा मुद्दा आणल्याने दोन्ही भावांना एकत्र यायला मोठा मुद्दा मिळाला. त्यानंतर दोन्ही भावांच्या गाठीभेटी होत राहिल्या. तीन महिन्यात सहा वेळा ठाकरे बंधू भेटले आहेत. या कौटुंबिक भेटी राजकीय भेटी केव्हा झाल्या ते त्यांच्या कार्यकर्त्यांनाही कळले नाही. उद्धव यांच्या उबाठा आणि राज यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी संयुक्त कार्यक्रम घेणे सुरू केले आहे. ठाण्यामध्ये दोघांनी शहराच्या प्रश्नांवर सभा घेतली. 'एकत्र राहण्यासाठी एकत्र आलो' असे उद्धव ठाकरे जागोजागी सांगत आहेत. राज ठाकरे यांनी मात्र अजून आपले पत्ते खुले केलेले नाहीत.

२० वर्षांपूर्वी राज ठाकरे हे शिवसेनेपासून वेगळे झाले होते. त्यांनी मनसे म्हणजे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना केली तेव्हा बाळासाहेब ठाकरे हयात होते. पहिल्याच निवडणुकीत दणक्यात मनसेचे १३ आमदार निवडून आले होते; पण नंतर मनसेला हवे तसे यश मिळाले नाही. नुकत्याच झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मनसेला एकही जागा जिंकता आली नाही. त्यांचा पुत्र अमित ठाकरे मुंबईत विधानसभा हरला. या पृष्ठभूमीवर मुंबई महापालिकेची निवडणूक समोर ठाकली आहे. मुंबईची निवडणूक भावासोबत लढायची की स्वतंत्र लढायची, या प्रश्नाचे उत्तर राज ठाकरेंना द्यायचे आहे. मात्र याबाबत त्यांनी अजून मौन पाळले आहे. त्यांना योग्य वेळेची वाट आहे. ३१ जानेवारीच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेऊन मोकळे व्हा असा आदेश सुप्रीम कोर्टाने मागेच दिला. दिवाळीनंतर निवडणुकांचा बिगुल वाजेल. म्हणजे दीड-दोन महिने अजूनही राजसाहेबांच्या हातात आहेत. पण एक लिहून घ्या. जागा वाटप होईपर्यंत राज ठाकरे अखेरची घोषणा करणार नाहीत. मुंबई महापालिकेत एकूण २२७ जागा आहेत. किती जागा राज ठाकरेंच्या मनसेला सोडतील उद्धव? गेल्या निवडणुकीत शिवसेनेला ८४ तर भाजपाला ८२ जागा मिळाल्या होत्या. महापौर बसवायचा असेल तर ११४ नगरसेवक पाहिजे. म्हणजे उबाठाला





किमान १५० जागा लढवल्या पाहिजेत. १५० जागा गेल्यानंतर वाटायला किती जागा उरतात? उद्धव यांना केवळ भावालाच नाही तर महाविकास आघाडीमधले काँग्रेस आणि शरद पवारांची राष्ट्रवादी या मित्रांनाही जागा सोडायच्या आहेत. या गणितात मनसे किती बसते? किती आणि कोणत्या जागा मनसेच्या वाट्याला येतील? गेल्या विधानसभा निवडणुकीत मनसेने मुंबईमध्ये २५ जागा लढवल्या होत्या. त्यांना कुठली जागा जिंकता आली नाही. पण त्यांनी चार टक्के मते घेतली. याचा अर्थ मुंबईमध्ये मनसेची चार टक्के मतं आहेत. ६७ जागी जिंकलेल्या उमेदवाराच्या लीडपेक्षा जास्त मतं मनसेला मिळाली आहेत. ९० वॉर्डांमध्ये मनसे निर्णायक ठरू शकते, असा मनसेचा दावा आहे. पण ९० जागा मनसेला दिल्या तर काँग्रेस आणि शरद पवारांना वाटायला चणेफुटाणे उरतात. त्यामुळे जागा वाटप ही मोठी सर्कस असणार आहे. राज ठाकरेंच्या मौनाचे रहस्य या सर्कशीत आहे. अपेक्षित जागा मिळाल्या नाही तर राज स्वतंत्र लढतील किंवा ते भाजपासोबतही बसू शकतात. मुंबईमध्ये मराठी मतांचा टक्का ३८ आहे. १९ टक्के मुस्लिम मतं आहेत. या दोघांची बेरीज ५७ टक्के होते. १७ टक्के उत्तर भारतीय आहेत. लोकसभा निवडणुकीत मुस्लिम मतं उबाठाला गेली होती. निवडणूक रणधुमाळीच्या अखेरच्या टप्प्यात काय माहोल बनतो, त्यावर सारा खेळ असेल. मनसे महाविकास आघाडीमध्ये असेल का? मनसेला बरोबर घेण्याला काँग्रेस आजच्या घडीला उत्सुक नाही. मनसेच्या महाविकास आघाडीमधील समावेशाबाबत प्रस्ताव नाही, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे. मनसेला आज सोबत घेतले तर बिहारच्या निवडणुकीत काँग्रेसविरोधात त्याचा प्रचाराचा मुद्दा केला जाईल, याची भीती काँग्रेसला आहे. यामुळे बिहारची निवडणूक होईपर्यंत मनसेशी संबंध ठेवायचे नाहीत, अशा मानसिकतेत काँग्रेस आहे. बिहारमध्ये शेवटच्या टप्प्याचे मतदान ११ नोव्हेंबरला आहे. ती आटोपल्यावर मनसेला सोबत घ्यायचे की नाही यावर चर्चा होईल. तोपर्यंत मनसेचा महाविकास आघाडीमधील प्रवेश अधांतरी आहे. मनसेची परप्रांतीयांबाबतची भूमिका जगजाहीर आहे. त्यामुळे मनसेला जवळ घेतलं तर परप्रांतीयांची मतं मिळणार नाहीत, असे काँग्रेसला वाटते. मुंबईमध्ये हिंदी भाषिक मतदारांची संख्या मोठी आहे. यातले उत्तर भारतीय मतदार भाजपाने आपल्याकडे वळवलेले असले, तरी उरलेल्यांना वजा करणे महाआघाडीला परवडणारे नाही. काँग्रेसने मनसेसोबत बसायचे नाही असे ठरवले तर उद्धव काय भूमिका घेतात त्याची उत्सुकता असेल. राज ठाकरे तोपर्यंत वाट पाहणे पसंत करतील? काँग्रेसला बरोबर घ्यावं असे राज ठाकरेंना खूप वाटतं. पण राहुल गांधींच्या मनात काय? ते पाहायचे.

महाविकास आघाडीच्या तुलनेत महायुतीची रणनीती ठरली आहे. भाजपा, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजितदादा पवार यांची राष्ट्रवादी मिळून महायुती लढत आहेत. ज्या ज्या ठिकाणी युती शक्य आहे तेथे युती करणार, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच जाहीर केले आहे. युती नाही तेथे मैत्रीपूर्ण लढती होतील, असेही फडणवीस सांगून मोकळे झाले आहेत. मात्र, मित्र पक्षांवर टीका न करण्याचे पथ्य सांगितले आहे. भाजपाचे १५० जागा जिंकण्याचे टार्गेट आहे. अजितदादांच्या राष्ट्रवादीची मुंबईत विशेष ताकद नाही. पण शिंदे सेना जास्तीच्या जागांसाठी अडून बसू शकते. भाजपा म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईची निवडणूक गांभीर्याने घेतली आहे. कुठल्याही परिस्थितीत मुंबईवर भाजपाचा महापौर बसवायचा चंग फडणवीसांनी बांधला आहे. यावेळी मुंबई हरलो तर आपण संपलो हे कठोर वास्तव उद्धव ठाकरे हेही ओळखून आहेत. भाजपा मुंबईमध्ये केलेल्या विकास कामांच्या जोरावर मतं मागत आहे तर उद्धव ठाकरे सहानुभूतीचे जुनेच कार्ड चालवत आहेत. 'ठाकरे ब्रँड'च्या नावावर जमत नाही हे लक्षात आल्याने आता त्यांनी निवडणूक यंत्रणेलाच टार्गेट केले आहे. मतदार याद्यांना पुढे करून विरोधी पक्ष 'फेक नॅरेटिव्ह' तयार करीत आहेत. त्यात त्यांना यश मिळण्याची शक्यता नाही. कारण मतदार हुशार झाला आहे. ▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

---

## आजचे संघगीत-१८

शुक्रवार, १७ ऑक्टोबर २०२५

### आत्मसमर्पण हे मम जीवन

आत्मसमर्पण हे मम जीवन
तव पदी वाहिले तन मन केतन ॥धृ.॥

तू राष्ट्राची मूर्त तपस्या हिंदुभूमिची एकच आशा
संघटनेची धरुनि मनीषा चाललास तू राष्ट्र तपोधन ॥१॥

अमित शक्तिची वांच्छा धरुनी तप आचरिसी राष्ट्रोद्धरणी
तुझ्या यशाच्या मार्गावरुनी वितरिन माझे जीवन कणकण ॥२॥

जीवन माझे एक जड शिला शिल्पकार तू त्यावर कुशला
हात कसाही चालव अपुला घडवी मूर्ती सुंदर त्यातुन ॥३॥

राष्ट्रभानु तू नभोविहारी पूजनी न मी तव अधिकारी
अर्पितसे तुज अभिमाने तरि ज्वलंत निष्ठा हेच उपायन ॥४॥

अहंभाव तो कुठला आता तुझ्यामध्ये मम विरे अस्मिता
हृदी बाणली आज्ञांकितता तव अनुशासन हे मम भूषण ॥५॥

तुझ्या प्रसादे पुनीत होता तव तेजाने मन संचरता
संघटनेच्या विजयाकरिता करीन सेवा दिव्य चिरंतन ॥६॥

असं'यात तव आज पदाती तुझ्या स्मितावर हलती फुलती
देत तयांना अखंड स्फूर्ती तव दृष्टीचे अमृतसिंचन ॥७॥

चढेल ध्वज हा उंच अंबरी ऐश्वर्याच्या सुवर्ण शिखरी
हिंदूजनता कृतार्थ सारी करील तेव्हा तुज अभिवंदन ॥८॥

---

## वाचक पत्रे

### धनत्रयोदशीचे महत्त्व

वर्षभरातील महत्त्वाच्या सणांपैकी एक महत्त्वाचा आणि आनंदाचा सण दिवाळी हा देशभरात जल्लोषात साजरा केला जातो. दिवाळीची सुरुवात धनत्रयोदशीपासून होते. या दिवशी भगवान धन्वंतरी यांची पूजा केली जाते, जे आयुर्वेदाचे देवता मानले जातात आणि वैद्यकीय शास्त्राचे जनक समजले जातात. या दिवसाला 'धनतेरस' असेही म्हणतात. धनतेरसच्या निमित्ताने घरी नवीन धातूच्या वस्तू, विशेषत: चांदी, सोने आणि धान्य खरेदी करण्याची परंपरा आहे. या सणाला धन व आरोग्याची वाढ होण्यासाठी विशेष मानले जाते. धन्वंतरी भगवान समुद्रमंथनातून अमृत घेऊन आले होते, म्हणूनच या दिवशी त्यांची पूजा केली जाते. अशी मान्यता आहे की धनत्रयोदशीच्या दिवशी धातू किंवा धन खरेदी केल्याने घरात समृद्धी आणि सौख्य येते. धनत्रयोदशीला सायंकाळी घराच्या मुख्य दाराजवळ तेलाच्या दिव्याने पूजन केले जाते. खरेदी केलेल्या धातूच्या वस्तूंचे पूजन करून त्या घरात ठेवतात. व्यापारी या दिवशी नवीन वह्यांची पूजा करतात. धनत्रयोदशी हा सण आरोग्य आणि समृद्धीला प्रोत्साहन देतो. या दिवसाच्या पूजनाने आपल्या जीवनात संपत्ती आणि आरोग्याची भरभराट होईल अशी अपेक्षा आहे.

**शंकर कुलकर्णी**/१७६४४६५५७०

### नंबर प्लेटचा दर्जा तपासूनच वितरण करावे

राज्यात सर्वच वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी प्लेट लावणे अनिवार्य केले आहे. लोकांनी त्यांच्या वाहनांच्या प्रकारानुसार पैसे भरून या नंबर प्लेट लावल्या आहेत. त्या कमी जाडीच्या असल्याने फिटमेंट सेंटरवर त्याला सपोर्ट म्हणून मागे प्लॅस्टिक प्लेट लावण्याकरिता पुन्हा वेगळे पैसे द्यावे लागतात. शासनाने ज्या ३ खाजगी कंपन्यांना या नंबरप्लेट बनविण्याचे कंत्राट दिले आहे, त्यांना जे मानक दिले त्यानुसार त्या नंबर प्लेट तयार होत आहे की नाही याची तपासणी शासनातर्फे व्हायला नको का? ते न करता ग्राहकांनी निकृष्ट नंबर प्लेटबाबत संबंधित कंपनीच्या अधिकृत पोर्टलवर तक्रार करावी व त्याची प्रत काढून आरटीओ कार्यालयात द्यावी, असे आरटीओ अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. निकृष्ट नंबर प्लेटच्या तक्रारी आल्यावरच शासन कारवाई करणार काय? दर्जा तपासणारी यंत्रणा काय करते आदी प्रश्न यामुळे उपस्थित होत आहे.

**मोहन पांडे**/नागपूर

### पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करूया

दिवाळीच्या सणात दिव्यांचा झगमगाट, फराळाची रेलचेल आणि फटाक्यांची आतषबाजी सर्वत्र बघायला मिळते. दिवाळीसाठी प्लॅस्टिकचे किंवा धातूचे दिवे न वापरता मातीच्या पणत्याच उपयोगात आणाव्या. आकाशदिवे कागदापासून तयार केलेले असावे. विजेच्या दिव्यांची सजावट करताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. हानिकारक रसायनांपासून तयार केलेली रंगीत रांगोळी न वापरता सेंद्रिय रंग वापरावेत. फुलांची रांगोळी काढल्यास ती पर्यावरणास अनुकूल असेल. भेटवस्तू देताना प्लॅस्टिकचा वापर करू नये. ज्यूट किंवा कागदी पिशव्या वापरणे इष्ट असेल. नर्सरीतून फळा-फुलांची रोपे आणून त्यांचा भेटवस्तू म्हणून वापर करावा. फराळाचे देतांना बायोडिग्रेडेबल प्लेट्स आणि प्याले निवडावे. फटाक्यांमुळे होणाऱ्या उच्च पातळीच्या आवाजाचा त्रास विशेषत: वृद्ध, बालके आणि पाळीव प्राण्यांना होत असतो. धुरामुळे वातावरण प्रदूषित होते. त्याचा दुष्परिणाम अनेकांच्या आरोग्यावर होतो. दमा आणि इतर श्वसनविकार बळावतात. कमी आवाजाचे आणि प्रदूषण न करणारे फटाके फोडावेत. दिवाळी साजरी करताना आपल्यामुळे इतरांना त्रास होणार नाही याची काळजी प्रत्येकाने घेणे आवश्यक आहे. ▮

**डॉ. मदन मनोहरराव काकडे**/९३७३११२४८७

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# हिंगोली, औंढ्यात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्यावतीने काळी दिवाळी साजरी




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ आक्टोबर**

हिंगोली येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तर औंढा नागनाथ येथील तहसील कार्यालय कार्यालयासमोर राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाच्यावतीने सरकारच्या फसव्या पॅकेजची होळी करीत काळी दिवाळी साजरी करण्यात आली.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्यावतीने राज्यामध्ये अतिवृष्टी नैसर्गिक संकट असल्यामुळे आम्ही शेतकरी राज्य सरकारच्या निषेधार्थ काळी दिवाळी साजरी करण्यात आली. राज्य सरकारने शेतकऱ्याला हेक्टरी ८५०० दिले अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अनेक नुकसान झाले आहे त्यामध्ये अनेकांच्या विहिरी, घरे, जनावरे, खरडून गेलेल्या जमिनी पिके यांना जाहीर करण्यात आलेले पॅकेज हे फसवेगिरीचे लक्षण असल्याचे दिसून येते त्या मुळे शेतकरी राजा येणारी दिवाळी काळी दिवाळी म्हणून साजरी करेल आणि या महायुती सरकारचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार निषेध करत आहे. शेतकऱ्याला हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी. शेतकऱ्याच्या जनावरांना सरकारने एक लाख रुपये देण्यात यावे.खरडून गेलेल्या जमिनींना नगदी स्वरूपामध्ये ३ लाख ४७ हजार रुपये हेक्टरी देण्यात यावे. शेतकऱ्यांना शासनाकडून मिळत असलेली रक्कम ही एमआरजीएस अंतर्गत न देता थेट नगदी स्वरूपामध्ये देण्यात यावी जेणेकरून शेतकऱ्याला शेती दुरुस्तीला उपयोगात येईल. अतिवृष्टीमध्ये पडझड झालेल्या घरांना तात्काळ स्वरूपामध्ये अर्थसहाय्य मंजूर करण्यात यावे तसेच शेतकऱ्यांच्या विहिरीसाठी दीड लाख रुपये देण्यात यावे आदी मागण्यांचा



निवेदनात समावेश आहे. यावेळी अॅड रवि शिंदे, अतीश दांडेगावकर, बंडू मुटकुळे,धीरज काकडे, श्याम कदम, गणेश कमळु, दौलत हंबाड, मुजीब पठाण, गजानन गव्हाणे, स्वप्नील मुळे, माणिकराव सावंत, नवनाथ रोदळे आदींची उपस्थिती होती. यावेळी प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले.

औंढा नागनाथ येथे नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनावर राष्ट्रवादी(शरद पवार गट) पक्षाचे प्रभारी कार्यकारी जिल्हाध्यक्ष मुनीर पटेल, भीमशक्ती जिल्हाध्यक्ष प्रमोद कुलदीपके, तालुकाध्यक्ष रमेश सानप, तालुका उपाध्यक्ष संभाजी चव्हाण, विकास पांडववीर, विजय साळवे,शेख वाजेद, शकील अहमद, काशिनाथ गायकवाड, विनोद गायकवाड भगवान गायकवाड बाळासाहेब मगर, एल आर वैद्य, पंडित श्रीखंडे, साहेबराव पवार, सुभाष खल्लाळ राम प्रसाद गायकवाड, प्रकाश गायकवाड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# फटाके उडवितांना बालकाच्या डोळ्याला गंभीर दुखापत

## डॉक्टरांच्या मदतीने बचावला डोळा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ आक्टोबर**

तालुक्यातील एका गावात लहान बालके दिवाळीचा पहिलाच दिवस वसु बारस असल्यामुळे फटाके उडविण्यात गुंग असतांना एका पाच वर्षीय बालकाच्या डोळ्याला फुटलेला फटाका उडून लागला. पालकांनी तातडीने येथील नेत्ररोग तज्ज्ञ डॉ किशन लखमावार यांचे दवाखान्यात दाखल केले. डॉक्टरांनी तातडीने उपचार करून या बालकाचा डोळा वाचविला. पालकांनी डॉक्टरांचे आभार मानले.

आजपासून सर्वत्र दिवाळी सणाला सुरूवात झाली आहे. बच्चे कंपनी फटाके उडविण्यात दंग झाली आहे. दि १७ आक्टोबर रोजी हिंगोली तालुक्यातील एका गावात वसु बारस निमित्त काही बालके फटाके उडवित होते. जवळच एक पाच वर्षीय बालक फटाके उडवितांना पाहत होता. अचानक उडविलेल्या फटाक्यातील एक फटाका त्याच्या डोळ्यातील बुबुळाला लागला. पालकांनी तातडीने हिंगोल येथील व्यंकटेश नेत्रालय व फेको सेंटर येथे उपचारासाठी दाखल केले. परिस्थिती लक्षात घेऊन डॉ किशन लखमावार, रेटीना तज्ज्ञ डॉ प्रतीक लखमावार, डॉ नेहा सचिन बोधगिरे यांनी तातडीने मुलाच्या डोळ्याची तपासणी करून डोळ्यात पडलेली फटाक्यांची दारू काढून डोळा स्वच्छ केला. त्यानंतर आवश्यक औषधोपचार केले आहेत. मुलास वेळीच उपचार मिळाल्यामुळे त्याचा डोळा बचावला आहे.

पालकांनी लहान मुलांना फटाके उडविण्यास देऊ नये. तसेच फटाके उडवित असतांना पालकांनी सोबत थांबावे, फटाका उडवित असतांना आवश्यक ती काळजी घ्यावी असे आवाहन डॉ किशन लखमावार यांनी केले आहे.

# आज हिंगोलीत जागर संविधानाचा सांस्कृतिक कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ आक्टोबर**

संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने जागर संविधानाचा या दोन दिवसीय जिल्हास्तरीय सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा उपक्रम सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या कल्पनेतून सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १८ व १९ ऑक्टोबरदरम्यान शिवाजीराव देशमुख सभागृह, हिंगोली येथे होणार आहे.

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राज्यभर विविध सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. भारतीय संविधान निर्मितीस २ वर्षे, ११ महिने आणि १७ दिवस इतका कालावधी लागला होता. संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद तर प्रारुप समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. मानवी मूल्यांचे रक्षण करणारे हे संविधान २६ नोव्हेंबर १९४९ रोजी स्वीकारण्यात आले. या ऐतिहासिक घटनेस ७५ वर्षे पूर्ण होत असल्याने हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी शनिवार, १८ ऑक्टोबर २०२५ रोजी संविधानावर आधारित शाहिरी, पोवाडा, गीत, कवने अशा विविध कलाप्रकारांचा समावेश असलेला सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात मुंबई येथील गायक अशोक निकाळजे व संच तसेच हिंगोली जिल्ह्यातील स्थानिक गायक दिनकर लोणकर व संच संविधान विषयावर आधारित सादरीकरण करतील. रविवार, १९ ऑक्टोबर २०२५ रोजी संविधानावर आधारित एक प्रेरणादायी महानाट्य सादर होणार आहे. या महानाट्याचे लेखन व दिग्दर्शन वैभव महाडिक यांनी केले असून शाहिरी, गीत आणि संवाद अशा बहुआयामी कलारूपात हे नाट्य सादर होईल.

हिंगोली येथे होऊ घातलेल्या संविधान अमृत महोत्सवी सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी कलाकारांच्या सादरीकरणातून भारतीय संविधानातील लोकशाही मूल्यांचा जागर होणार असून, कला रसिक प्रेक्षकांनी या कार्यक्रमांचा नक्कीच लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.



**हिंगोली– उमेद महिला बचत गटाच्यावतीने दिवाळी निमित्त येथील जिल्हा परिषद कार्यालयाच्यासमोर बचत गटांनी विविध प्रकारचे स्टॉल लावले आहेत. या स्टॉलचे उद्घाटन प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांचेहस्ते करण्यात आले. या स्टॉलवर पणत्या, फराळाचे साहित्य तसेच इतर साहित्य विक्रीसाठी आले आहेत. या स्टॉलवरून साहित्य खरेदी करण्याचे आवाहन केंद्रे यांनी केले आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### शिवाजी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन



हिंगोली– येथील शिवाजी महाविद्यालयात वाचन मंडळ, मराठी विभाग, तसेच राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षिरसागर हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. पवार जी.आर., डॉ. वाघ एस. जी., डॉ हुरगुळे एन. आर. हे होते. यावेळी महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवनावर विचार व्यक्त केले. डॉ. पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांनी दररोज काही शब्द किंवा पुस्तकाचे पाने वाचली तर वर्षभरात खूप मोठा शब्दसंग्रह त्यांचा वाढू शकतो. तसेच वाचनाचे महत्त्व पटवून दिले. त्याचबरोबर डॉ. वाघ यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मुंढे एस. एन. यांनी केले. तर आभार प्रदर्शन डॉ. भुसारे एस. आर. यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. कऱ्हाळे एस. एम., प्रा. इंगळे, तसेच विद्यार्थी यांनी परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद तसेच प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्राथमिक शिक्षकांसाठी ऑनलाईन परीक्षा

हिंगोली– राज्यातील सर्व जिल्हा परिषदेमधील कार्यरत प्राथमिक शिक्षकांना केंद्रप्रमुख पदावर विभागीय मर्यादित स्पर्धा परीक्षेद्वारे नियुक्ती देण्यासाठी समूह साधन केंद्र समन्वयक (केंद्र प्रमुख) मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा–२०२५ या परीक्षेचे ऑनलाईन पद्धतीने दि. १ ते ५ डिसेंबर, २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात येणार आहे. दि. २९ सप्टेंबर, २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. या अधिसूचनेतील जाहिरातीस अनुसरून निश्चित अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास उमेदवाराने कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठाची बीए, बीकॉम, बीएससी ही पदवी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. शासन निर्णय दि. २९ ऑगस्ट, २०२५ नुसार दि. १ जानेवारी २०२५ रोजी अखंड नियमित सेवेचा कालावधी विचारात घेण्यात येईल आणि जिल्हा परिषदेच्या प्रशिक्षित पदवीधर शिक्षक (प्राथमिक) किंवा प्रशिक्षित शिक्षक (प्राथमिक) या पदावर किमान सहा वर्षे अखंडीत सेवा पूर्ण करणे आवश्यक आहे. यासाठी शिक्षण सेवक पदावरील सेवा ग्राह्य धरण्यात येईल, असे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या उपायुक्तांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# एबीएम इंग्लीश स्कुलमध्ये दिवाळी साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ आक्टोबर**

येथील ए.बी.एम. इंग्लिश स्कूलमध्ये दिवाळी सण उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी संस्थाध्यक्ष दिलीप बांगार, प्राचार्य रॉबिन वर्गीस, अंजिक्य बांगार, उपप्राचार्य सचिन डोईफोडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

या वेळी विद्यार्थ्यांनी घरी तयार केलेले आकाशकंदील व दिवे शाळेत आणून शाळा सजविली होती. तसेच राम–लक्ष्मण, सीता, हनुमान यांची वेशभूषा करून रामलीला आयोजीत केली होती. संस्थाध्यक्ष दिलीप बांगार यांनी दिवाळी सणाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. पारंपारीक पध्दतीने सण साजरे कसे करतात याबाबत सांगितले. सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या घरी तयार केलेले दिवाळी फराळ एकमेकांना फराळ वाटून विद्यार्थ्यांनी एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# हिंगोलीत जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलन अध्यक्षपदी अर्धापूरकर, स्वागताध्यक्ष डॉ. संजय नाकाडे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ आक्टोबर**



जिल्ह्यातील साहित्यप्रेमींसाठी दीपावलीच्या पार्श्वभूमीवर एक वैचारिक पर्वणी सज्ज होत आहे. महाराष्ट्र शासन पुरस्कृत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, तसेच श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, लोहारा बु. यांच्या संयुक्त विद्यमाने २५ व २६ ऑक्टोबर रोजी हिंगोली येथे जिल्हास्तरीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक व नामवंत कादंबरीकार अशोक अर्धापुरकर यांची निवड करण्यात आली आहे. स्वागताध्यक्ष म्हणून डॉ. संजय नाकाडे, तर कार्यवाह म्हणून गोडाती काळे हे कार्यभार सांभाळणार आहेत.

हा दोन दिवसीय साहित्यिक सोहळा शिवाजीराव देशमुख सभागृह, हिंगोली येथे रंगणार असून, मराठी साहित्य, संस्कृती आणि विचारांचे विविध प्रवाह या संमेलनात साकारले जाणार आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य श्री. जयू भाटकर, प्रा. डॉ. मार्तंड कुलकर्णी, प्रा. विलास वैद्य, तसेच श्री. शिवाजीराव पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडणार आहे.

संमेलनाच्या स्मरणिका प्रकाशनाचाही समावेश असून, संपादक म्हणून कवी कलानंद जाधव, कार्यकारी संपादक गणेश येवले कार्यरत असतील. व्यवस्थापन समितीचे प्रमुख प्रमोद धवसे, तर समन्वयक डॉ. प्रेमेन्द्र बोथरा असतील.

संमेलनाचे आयोजन श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा सौ. छाया चिमणराव धवसे व साहित्य संमेलनाचे कार्यवाह गोडाती काळे यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

कार्यक्रमाच्या तयारीला सध्या अंतिम टप्पा आला असून, हिंगोलीत साहित्य, संस्कृती आणि संवाद यांचा संगम घडविण्याची सर्व तयारी पूर्ण झाली आहे.

या संमेलनात जिल्ह्यातील साहित्यिक, कवी, लेखक आणि रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजन समिती सदस्य चिमणराव धवसे, गोडाती काळे, प्रमोद धवसे, डॉ. प्रेमेन्द्र बोथरा, रतन आडे, कलानंद जाधव, गणेश येवले, दिलीप धामणे, सौ. सुमन दुबे, राधिका देशमुख, पारिजात देशमुख, राजकुमार मोरगे यांनी केले आहे.

# जिव्हाळा संस्थेकडून पूरग्रस्तांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ आक्टोबर**



इंटरनॅशनल आयकॉन पुरस्कार व आयएसओ मानांकन प्राप्त जिव्हाळा संस्था यांच्या पुढाकाराने व गुंज संस्था, दिल्ली च्या सहकार्याने हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील पूरग्रस्त कुटुंबांसाठी मदतकार्याची सुरुवात करण्यात आली आहे. मागील दीड महिन्यापासून आसना नदीच्या पुरामुळे व भयंकर अतिवृष्टी झाल्यामुळे परिसरात भीषण पूरस्थिती निर्माण झाली होती. जिव्हाळा संस्थे च्या स्वयंसेवकांनी या सर्व भयावह परिस्थिती चा प्रत्यक्ष गाव भेटी देऊन आढावा घेतला या आपत्तीमध्ये शेकडो कुटुंबांचे घरे, शेती, जनावरे व जीवनावश्यक वस्तूंचे प्रचंड नुकसान होऊन अनेक कुटुंबे बेघर व संकटात सापडली. या कठीण प्रसंगी जिव्हाळा संस्था आपत्तीग्रस्त नागरिकांच्या सोबत खंबीरपणे उभी राहिली आहे. जिव्हाळा संस्थे च्या सचिव रोहिणी अलमुलवार यांच्या हस्ते कुरुंदा ता. वसमत या गावांमध्ये मदत वितरणाचा शुभारंभ झाला. या उपक्रमा अंतर्गत ६२ हून अधिक कुटुंबांना फॅमिली किट वाटप करण्यात आले. या किटमध्ये कपडे, बूट–चप्पल, सतरंजी, भांडी, ताडपत्री, तांदूळ, तूर दाळ तसेच गृहउपयोगी साहित्याचा समावेश होता. या मदतीमुळे हजारो कुटुंबांना तातडीचा दिलासा मिळून त्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलले. जिव्हाळा संस्थेचे च्या सचिव रोहिणी अलमुलवार म्हणाल्या कि हिंगोली जिल्हा प्रशासन यांच्या मार्गदर्शनाखाली जिव्हाळा संस्था हिंगोली जिल्ह्यामध्ये नैसर्गिक आपत्तीमध्ये अविरत मदतकार्य करीत आहे. हिंगोली जिल्ह्यात हजारो कुटुंबाना मदत करणे सुरू आहे ही मदत कार्य अविरत सुरू राहणार आहे तसेच अतिशय गरजवंत पूरग्रस्तांना मदत पोहोचणार आहे, तसेच गुंज संस्था, दिल्ली यांच्या अमूल्य सहकार्यामुळेच ही मदत शक्य झाली त्याबद्दल गुंज संस्थे चे त्यांनी आभार मानले. संस्थेच्या स्वयंसेवकांच्या अथक परिश्रमामुळेच हा उपक्रम यशस्वी ठरला.

या वेळी जिव्हाळा संस्थे च्या सचिव रोहिणी अलमूलवार कुरुंदा गावचे सरपंच प्रतिनिधी संकेत इंगोले, ग्राम पंचायत कर्मचारी गणेशराव वटणे उपस्थित होते या अभियानात गुंज संस्थे चे प्रशांत रणदिवे, जिव्हाळा संस्थेचे स्वयंसेवक रोहित अलमुलवार, संकेत डोंगरे, अमित जागींड, सुमित जागींड, रोहन अलमूलवार आदींनी मोलाचे योगदान दिले.

# ७७ वाहन चालकाविरूध्द कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ आक्टोबर**

अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७७ वाहन चालकांविरूध्द पोलिस दलाने ठिकठिकाणी कारवाई करीत त्यांच्याकडून ६४ हजार ६५० रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच एका जुगार अड्ड्यावर छापा मारून मुद्देमाल जप्त करीत आरोपीताविरूध्द जुगार कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन ठिकाणी दारू अड्ड्यावर छापे मारून अवैध दारू जप्त करून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे

# कापुस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आमदार केराम दिल्ली दरबारी

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १७ ऑक्टोबर-**

किनवट व माहुर या आदिवासी बहुल मतदारसंघातील शेतकऱ्यांना आपल्या कापुस या पिकाची शासकीय हमीभावाने शासनाच्या खरेदी केंद्रावर विक्री करता यावे यासाठी आमदार भीमराव केराम यांनी थेट दिल्ली गाठुन हा प्रश्न सोडवण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

किनवट व माहुर तालुक्यातील कापुस उत्पादक शेतकऱ्यांना आपले कापसाचे पिक तेलंगणा राज्यातील आदिलाबाद येथील CCI (Cotton Corporation of India) केंद्रावर विक्री करण्याची परवानगी मिळावी अशी मागणी किनवट माहुर विधानसभा क्षेत्रातील प्रतिष्ठीत नागरीक व प्रगतिशिल शेतक-यांनी केली असता नागरीकांची समस्या सोडवण्याच्या दृष्टीने, आमदार भिमराव केराम यांनी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाकडे (National Commission for Scheduled Tribes) तक्रार दाखल केली होती.



या प्रकरणाची सुनावणी (दि. १६ ऑक्टोबर) दिल्ली येथील आयोगाच्या कार्यालयात झाली. आयोगाचे अध्यक्ष आंतरसिंग आर्या यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सुनावणीत उउख चे जनरल मॅनेजर ललित गुप्ता उपस्थित होते. सुनावणीदरम्यान आयोगाने गंभीर दखल घेत महाराष्ट्र व तेलंगण राज्यांच्या पनन व मार्केटिंग सचिवांना नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत. आयोगाने पुढील सुनावणी दि. २९ ऑक्टोबर २०२५ रोजी ठेवली असून त्या दिवशी संबंधित दोन्ही राज्य सरकारांकडून अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या सुनावणी मुळे किनवट व माहुर परिसरातील हजारो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून, राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोगाच्या पुढील सुनावणीत हा प्रश्न निकाली लागला तर किनवट माहुर विधानसभा क्षेत्रातील कापुस उत्पादक शेतकरी आपला कापूस हे पिक तेलंगणा राज्याच्या उ.उ.ख. च्या आदिलाबाद केंद्रावर विक्री करू शकतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

आमदार केराम यांनी या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, किनवट माहुर विधानसभा क्षेत्रातील सर्व सामान्य व आदिवासी शेतकऱ्यांना त्यांच्या कापसाला योग्य दर आणि योग्य बाजारपेठ मिळावी, यासाठीच मी हा लढा दिला आहे. आयोगाने तत्काळ कारवाई करून संबंधित सचिवांना नोटीस बजावल्यामुळे आमच्या शेतकऱ्यांच्या कापुस या पिकांच्या विक्री संदर्भातील समस्या लवकरच मार्गी निघेल असाआत्मविश्वास आता आमचा वाढला आहे.

किनवट परिसरातील शेतकऱ्यांनी आमदार भिमराव केराम यांनी केलेल्या प्रयत्नां बद्दल आभार मानत आनंद साजरा केला आहे, हा निर्णय पुर्नत्वात आला तर तो किनवट माहुर विधानसभा क्षेत्रातील कापुस उत्पादक शेतकऱ्यांसाठी खुप मोठा दिलासा देणारा आणि न्याय मिळवून देणारा ठरेल, अशी प्रतिक्रिया प्रगतिशिल शेतकरी मुकुंद नेम्मानिवार यांनी दिली आहे.

## पक्षश्रेष्ठीने संधी दिल्यास संधीचे सोने करू : उद्धव शिंदे

**नवीन नांदेड** -जिल्हा परिषद निवडणुका २०२५ चे वातावरण वरच्यावर तापत असल्याने विविध पक्षात रसिखेच सुरू झालेले आहे.



जिल्हा परिषद धनेगाव सर्कल नव्याने झाल्याने व सर्वसाधारण महिलेस सुटले आहे तेव्हा या ठिकाणी शिवसेना शिंदे गटाचे निष्ठावंत कार्यकर्ते उद्धव पाटील शिंदे यांनी येथील दावेदार आपणच असल्याचे सांगितले आसुन धनेगाव सर्कल मधून पक्षश्रेष्ठीने संधी दिल्यास संधीचे सोने करू असे मत त्यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषद धनेगाव सर्कल येथील दावेदार उमेदवार शिवसेना शिंदे गटाचे उद्धव पाटील शिंदे हे गेल्या ३५ वर्षापासून आ. हेमंत पाटील यांच्या खांद्याला खांदा लावून अहोरात्र एकनिष्ठेने पक्षाचे कार्य केले आहे. शाखाप्रमुख, सर्कल प्रमुख, तालुकाप्रमुख या सर्व पदावरून आजपर्यंत मी काम केले आहे. तेव्हां आज मला एक संधी मिळाली आहे. ते पक्षश्रेष्ठींनी माझ्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्यास संधी दिल्यास माझ्यासारख्या कार्यकर्त्याचे मनोबल उंचावून अधिकच्या जोमाने पक्षाचे कार्य करून संधीचे सोने करू असे ते म्हणाले या ठिकाणी मांडले उपऱ्यांना संधी देऊ नये अशी माझी पक्षश्रेष्ठीकडे मागणी आहे. शिवसेना पक्षाकडून जिल्हा परिषद धनेगाव सर्कल मधून निवडणूक लढवण्यास आपण सक्षम असल्याचे सांगून येथे आपणच दावेदार असल्याचे पक्षश्रेष्ठीकडे सांगण्याचा प्रयत्न उद्धव पाटील शिंदे यांनी केला आहे.

## ज्येष्ठ समाजसेविका आशाताई शिंदे यांची आनंद दत्तधाम आश्रमास भेट




**माहूर** - लोहा-कंधारचे शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार तसेच माजी सनदी अधिकारी श्यामसुंदर दगडूजी शिंदे यांच्या सुविद्य पत्नी तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या भगिनी ज्येष्ठ समाजसेविका सौ. आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनी आपल्या अनेक महिला भगिनी व कार्यकर्त्यांसह आज शुक्रवार १७ ऑक्टोबर रोजी माहूरच्या आनंद दत्तधाम आश्रमास भेट देऊन मठाधिपती सद्गुरु दभप राष्ट्रसंत तथा महाराष्ट्र शासनाचे स्वच्छता दूत साईनाथ महाराज वसमतकर यांचा आशिर्वाद घेतला. यावेळी महाराजांनी त्यांचा यथोचित सन्मान-सत्कार केला. नांदेड येथील अनेक महिला भगिनींसह सौ. आशाताई शिंदे ह्यांनी आज शुक्रवारी माहूर येथे देवदर्शनाला आल्या होत्या. यावेळी त्यांनी येथील धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमासह विविध जनकल्याणकारी उपक्रम राबविण्यासाठी ख्यातनाम असलेल्या आनंद दत्त धाम आश्रमाला भेट देऊन महाराष्ट्र शासनाचे स्वच्छता दूत मठाधिपती राष्ट्रसंत साईनाथ महाराज वसमतकर यांचा आशिर्वाद घेतला. या प्रसंगी महाराष्ट्राचे ब्रँड अँबेसिडर स्वच्छता दूत राष्ट्रसंत सद्गुरू साईनाथ महाराज वसमतकर यांच्या शुभहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना आशाताई शिंदे यांनी साईनाथ महाराजांचे कार्य हे सर्वांसाठीच प्रेरणादायी असल्याचे, प्रशंसोद्गार काढले. या कार्यक्रमास किन्हाळकर गायकवाड, शेटकार,जाधव आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. उपस्थित सर्वांनी सौ. आशाताईंच्या समाजकार्यातील योगदानाचे मनःपूर्वक कौतुक केले. सोबतच आश्रमाच्या प्रगतीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचलन व आभार शेषराव पाटील यांनी मानले. यावेळी पुंडलिक हुंम्बे, पंजाब माने, संतोष मते, अनिल सुरोशे, कलाने,आव्हाड, सोनोने, गजानन मुकाडे यांची उपस्थिती होती.

## भवानी तांड्यावर आरोग्य देवता धन्वंतरी पूजन व मोफत आरोग्य शिबिर

**बाऱ्हाळी** -स्व. शंकरराव पवार प्रतिष्ठान आणि आरोग्य उपकेंद्र सुगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य देवता श्री धन्वंतरी पूजन आणि मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन दि. १८ ऑक्टोबर २०२५ रोजी, शनिवार, सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत भवानी तांडा येथे करण्यात आले आहे. या उपक्रमाचा लाभ नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन तालुका आरोग्य अधिकारी डॉ.आकाश देशमुख व प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजित शंकरराव पवार (पत्रकार) यांनी केले आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. अशोक कौरवार (MD मेडिसिन, अध्यक्ष IM मुखेड) यांनी भूषविले असून, उद्घाटक म्हणून डॉ. आकाश देशमुख (तालुका आरोग्य अधिकारी, मुखेड) हे उपस्थित राहणार आहेत.
या आरोग्य शिबिराला विविध क्षेत्रातील मान्यवर डॉक्टरांची उपस्थिती लाभणार आहे: डॉ. रामराव श्रीरामे बालरोग तज्ज्ञ, अध्यक्ष तडच् मुखेड, प्रसिद्ध रेडिओलॉजिस्ट डॉ. श्रीहरी बुडगेमवार ,डॉ. प्राजक्त झरीकर ,डॉ. शिवसांब वडेर ,डॉ. प्रिया खंडागळे स्त्री रोग तज्ञ,डॉ. पांडुरंग श्रीरामे दंत रोग तज्ञ,डॉ. किरण चिवडे ,डॉ. पृथ्वीदास पत्की या शिबिरात सामान्य आरोग्य तपासणी, महिलांसाठी विशेष तपासणी, बालरोग, दंतरोग, आणि इतर आवश्यक वैद्यकीय सेवा मोफत दिल्या जाणार आहेत. नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा आणि आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे समुदाय आरोग्य अधिकारी सुगाव (बु) डॉ. शिवसांब वडेर यांनी कळवले आहे.

## दहावी-बारावीच्या परीक्षा फेब्रुवारी-मार्च मध्ये

**नांदेड** -महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत आगामी फेब्रुवारी-मार्च २०२६ मधील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेच्या लेखी, प्रात्यक्षिक व इतर परीक्षा पुढील तारखांना आयोजित करण्यात येत आहे.

# विष्णुपुरी येथे रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान कार्यक्रम

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १७ ऑक्टोबर-**

प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड व कै. गणपतराव पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मांजरम,यांच्या संयुक्त विद्यमाने पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी 'रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान कार्यक्रम ' पार पडला.

पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान अंतर्गत कार्यक्रम पार पडला यावेळी सुरुवातीला मान्यवरांचा प्रशालेच्या वतीने स्वागत करण्यात आला,कार्यक्रमाचे अध्यक्ष पंकज कंतेवार साहेब, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक, प्रादेशिक परिवहन कार्यालय नांदेड, यांनी पाद चाऱ्यांसाठी रस्ता सुरक्षा टिपा व वॉक ऑन राईट संकल्पना मांडून वाहतूक चिन्हांची माहिती आणि रस्ते अपघातांची कारणे विद्यार्थ्यांना पटवून सांगितली. हेमंत साळुंखे साहेब, सहाय्यक मोटर परिवहन निरीक्षक यांनी बचावात्मक पद्धतीने वाहन चालवणे, व हेल्मेट व सीट बिल चे महत्व सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संयोजक श्रीपात पाटील शिंदे मांजरमकर अध्यक्ष कै. गणपतराव पाटील बहुउद्देशीय सेवाभावी संस्था मांजरम, यांनी विद्यार्थ्यांना अपघातग्रस्तांना मदत कशी करावी, हेल्मेट न वापरल्याने त्याचे होणारे परिणाम, अपघातामुळे दरवर्षी दीड लाख लोक मृत्युमुखी पडतात असे सांगून वाहतुकीचे धडे दिले, आणि रस्ते की पाठशाला ही पुस्तक १२०० विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे मोफत वाटप करून रस्ता सुरक्षेचे महत्त्व सांगून संस्थेच्या कामगिरीचे वर्णन केले. या प्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजूभाऊ हंबर्डे, माजी जि प सदस्य साहेबरावजी हंबर्डे, विश्वनाथ रावजी हंबर्डे, व इतर मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक उदय हंबर्डे, शिवाजी वेदपाठक, कृष्णा बिरादार, आनंद बळगे, पाटील सर, इमनेलू सर, विकास दिग्रसकर, यांचे विशेष योगदान होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम. ए. खदीर यांनी केले तर मान्यवरांचे आभार प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ उज्वलाताई जाधव मॅडम यांनी मानले .

# उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी पकडला ट्रॅक्टर

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. १७ ऑक्टोबर-**

माहूर तालुक्याला उपविभागीय अधिकारी पोलीस अधिकारी म्हणून नव्याने रुजू झालेले किरण भोंडवे यांनी तालुक्यातील ईवळेश्वर रस्त्यावर कुठल्याही प्रकारची परवानगी नसताना अवैधरित्या ट्रॅक्टर मध्ये वाळू भरून नेत असताना रात्रीला पाठलाग करून ट्रॅक्टर पकडून जप्त करत माहूर पोलीस ठाण्यात आणून जमा केल्याची धाडसी कारवाई केल्याची खळबळजनक घटना दि.१६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी साडेसात वाजता घडली. या धडक कारवाईमुळे वाळू तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे.



पावसाळा संपण्याआधीच वाळू तस्करांनी नांग्या वर काढून नदी नाले ओढ्यातून वाळू तस्करी सुरू केल्याची चर्चा होत असतानाच नव्याने रुजू झालेले तरुण तडफदार उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांना माहिती मिळाल्याने वानोळा परिसरात गस्तीवर असताना कुपटी ते इवळेश्वर रस्त्यावर एक ट्रॅक्टर लाईट बंद करून जातानाचा आवाज आल्याने त्यांनी त्याचा पाठलाग केला. इवळेश्वर जवळ त्यास अडवून तपासणी केली असता ट्रॅक्टर क्रमांक एम एच २९ बी व्ही ४११५ आढळून आला. त्यामध्ये वाळू भरून दिसल्याने त्यांनी सोबतच्या पोलिसांना त्यास माहूर पोलीस स्टेशनमध्ये आणण्याचे सांगून पोलीस ठाण्यात आणल्यानंतर त्यावर कायदेशीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कार्यवाहीत उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांचेसह पोउपनी शरद घोडके, सपोउपनी पालसिंग ब्राह्मण, पोका अवधूत कावडे, नवनाथ कोरडे, परमेश्वर मामीलवाड,दत्तात्रय सोनटक्के,यांचे सह पोलिसांनी सहभाग घेतला. उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांनी आल्या आल्याच लपून-छपून सुरू असलेल्या अवैध व्यवसायांवर प्रहार करणे सुरू करून वाळू तस्करांनाही दणका दिल्याने, उपविभागीय पोलीस अधिकारी किरण भोंडवे यांचे कायदा व शांतताप्रिय नागरिकांमधून अभिनंदन होत आहे.

# जिल्ह्यात उत्कृष्ट कामगिरी; पो. नि. चिंचोलकर व टीमचा गौरव

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ ऑक्टोबर-**

मागील सप्टेंबर महिन्यामध्ये नांदेड जिल्यात मध्ये ३६ पोलीस स्टेशन पैकी उत्कृष्ट कामगिरी बाबत नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या टिमचा उत्कृष्ट कामा बाबत दोन प्रशस्तीपत्र देऊन विशेष पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप गौरव केला आहे.



नांदेड जिल्ह्यामध्ये कौतुकास्पद कामगिरी मध्ये अनेक गुन्हेगारांना प्रतिबंध करून त्यांना एक वर्षासाठी जेलमध्ये पाठवले, अनेक गुन्हेगारांना हद्दपार केले, इतर गुन्हेगार व दारू विक्रेते यांच्यावर उत्कृष्ट प्रतिबंधक कारवाई करण्यात आली. तसेच नांदेड ग्रामीण हद्दीतील जास्तीत जास्त समन्स बजावणी करून ९२ टक्के पेक्षा जास्त समन्स बजावणी केली व जास्तीत जास्त साक्षीदार यांना न्यायलयात हजर करण्यात आले. या कामगिरी बद्दल पो.नि. चिंचोलकर, पो. हवा. मुंडे, पो.हवा. जगताप, पो. हवा जाधव यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

चालू वर्षात पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी ग्रामीण पोलिसांच्या विविध हेड खालील उत्कृष्ट कामगिरी संबंधाने चार वेळा प्रशस्ती पत्र देऊन गौरव केलेला आहे.

दरम्यान पो.नि. चिंचोलकर यांच्या कार्यकाळामध्ये ग्रामीण पोलीस स्टेशन मधील गुन्हेगारांवर वचक बसली असून गुन्हेगारी कमी झालेली आहे.

# बारड येथे सामाजिक बाधिलकी व शैक्षणिक विकासाकरिता सहविचार सभा

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १७ ऑक्टोबर-**

मुदखेड तालुक्यातील बारड ग्रामपंचायत, व्यापारी संघटना, व स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१६ ऑक्टोबर रोजी विठ्ठलरुक्मिणी मंदिर या ठिकाणी सामाजिक बांधिलकी व शैक्षणिक समस्या या संदर्भात चर्चासत्र आयोजित केलेले होते या बैठकीस कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून संजयराव देशमुख बारडकर तर प्रमुख पाहुणे: बाळासाहेब देशमुख बारडकर (माजी सरपंच) आनंदराव गादीलवाड (माजी पंचायत समिती सभापती मुदखेड) सौ शुभांगी तळणकर मॅडम (मुख्याध्यापिका जि.प.हा. बारड )

दिगंबरराव गुरुजी, हरिश्चंद्र देशमुख,बन्सीलाल बिहारी दरक,ओम प्रकाश गोविंदराव कवळे,राजगोपाल बाहेती,संजय रघुनाथराव देशमुख,गजानन कचरे,कैलास पुलकुंटवार,साजिद पठाण,दिलीप कल्याणकर,आशिष देशमुख, डॉ. शिंदे, डॉ. चिंतले, डॉ. एस एन देशमुख, डॉ. कस्तुरे, डॉ सुरज शिदे, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून विचार सभेला सुरुवात झाली कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून प्रा.डॉ.पंजाब शिंदे यांनी कार्यक्रमाचा उद्देश सांगताना गावागावांतील लोप पावत चाललेला एकोपा राजकारणामुळे होत अडलेली टोकाची दुही, गावात जरब असलेल्या



माणसाचा अभाव, शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांची उदासीनता, पालकांचे दुर्लक्ष, विद्यार्थ्यांकडून गैरवर्तन होत असताना समाजाची होत असलेली डोळेझाक, यासंदर्भानेच उपस्थित होत असलेल्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी कार्यक्रम ठरल्याचे सांगितले.

उपस्थित सुजान नागरिकांसमोर सेवानिवृत्त शिक्षक दिगंबरराव कदम गुरुजी यांनी दीर्घ मार्गदर्शनात आपल्या असलेल्या सामाजिक बांधिलकी व त्यातून उत्तराई होण्यासाठी आपले कर्तव्य तसेच शिक्षणाप्रती पालकांनी सजग कसे असावे यासंदर्भात मार्गदर्शन केले. सौ तळणकर मॅडम यांनी विद्यार्थी पालक शिक्षक या त्रिकोणाबरोबरच चौथा कोण समाज म्हणून आपली ही तितकीच महत्त्वाची भूमिका विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये असून त्यांना आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहामध्ये तारून जाण्यासाठी जिद्दीने अभ्यास करण्यासाठी पालकांनी लक्ष द्यावे व सकारात्मक विचाराची पेरणी विद्यार्थ्यांमध्ये कशी करावी यासंदर्भात मार्गदर्शन केले.

अध्यक्ष समारोपमध्ये संजय देशमुख बारडकर यांनी बारड गावातील व पंचक्रोशीतील वैभवशाली इतिहास सांगताना जाती धर्मातील असलेला सलोखा,एकमेकावर असलेली नैतिक जबाबदारी, त्याचबरोबरच सामाजिक भान याचा उलगडा करताना जुन्या गावाचे चित्र सर्वांच्या डोळ्यासमोर उभे केले. त्याबरोबरच राजकीय पटलावर क्रांतीवीरांपासून ते राजकीय क्षेत्रात उतुंग कार्य करणाऱ्या कै. रंगराव देशमुख, कै. माजी आ. साहेबराव बापू, राजाराम देशमुख, शंकरराव देशमुख बारडकर यांची राजकीय कारकिर्दी सांगितली व बारडच्या विकासात व्यापारी वर्गाचे महत्त्व यावरही प्रकाश टाकला, नागरिकांना व पालकांना आपल्या जबाबदाऱ्यांची आठवण करून दिली याप्रसंगी गावातील प्रतिष्ठित व्यापारी सुजाण नागरिक शेतकरी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मनोहर ओसावार यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.कैलास खानसोळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामपंचायत बारड,व्यापारी संघटना व स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ चे कार्यकारी संचालक मंडळांनी योगदान दिले.

# शासकीय रुग्णालयातील उपकरणे रुग्णसेवा पारदर्शकतेसाठी कठोर कायदा होणार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ ऑक्टोबर-**

ग्रामीण भागातील आरोग्याचा कणा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शासकीय रुग्णालयामधील उपकरणांची बऱ्याच वेळा मोठ्या प्रमाणात धूळखात पडतात , नासधूस होत असते किंबहुंना अनेक वेळा असे साहित्य चोरीस जाते , अडगळीला पडते , नादुरुस्त होते त्यामुळे गोरगरीब रुग्णांना योग्य उपचार मिळत नाहीत . ही बाब लक्षात घेता खा. डॉ. अजित गोपछडे यांनी शासकीय रुग्णालयामध्ये वैद्यकीय उपकरणांची नियमित आणि कार्यक्षम देखभाल करण्यासाठी कठोर कायदा करून केंद्रीय पोर्टल स्थापन करावे अशी मागणी केली होती या मागणीनुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेत असे कठोर कायदा करत वेब पोर्टल तयार करण्याचे अनुषंगाने संबंधित विभागाला आदेश दिले आहेत.



ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शासकीय रुग्णालये काम करतात . या ठिकाणी असलेल्या वैद्यकीय उपकरणांची नियमित आणि कार्यक्षम देखभाल करणे अत्यंत आवश्यक असते. तांत्रिक सहाय्य व साधनसामग्रीची मर्यादा लक्षात घेता उपकरणे वेळेवर दुरुस्त होणे कठीण जात असल्याचे अनेकवेळा निदर्शनास आले आहे. नादुरुस्त किंवा अडगळीत पडलेल्या तांत्रिक साधनसामग्रीचा थेट परिणाम रुग्ण सेवेवर होतो आहे . एक्सरे , सिटी स्कॅन , एम आर आय मशीन , सोनी ग्राफी अशी महत्वाची उपकरण असूनही बंद आहेत असे सांगितले जाते . त्यामुळे गोरगरीब रुग्णांची मोठी हेळसांड होते. या पार्श्वभूमीवर शासकीय रुग्णालयामधील उपकरणांच्या देखभालीसाठी एक मजबूत आणि सुसंगत यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे . त्यासाठी सर्व शासकीय रुग्णालयातील उपकरणांची सविस्तर माहिती नोंदवण्यासाठी एक केंद्रीकृत वेब पोर्टल सुरू करण्याबाबत आणि कठोर कायदा करण्यासाठी खा. डॉ. अजित गोपछडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिनांक २४ जुलै २०२५ रोजी पत्र लिहिले होते. या पत्राची दखल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीरपणे घेतली असून आरोग्य विभाग लवकरच एक केंद्रीकृत वेब पोर्टल तयार करेल असे आदेश काढले आहेत. केंद्रीकृत वेब पोर्टल आणि कठोर कायदा झाल्यानंतर संबंधित सर्व शासकीय रुग्णालयातील उपकरणांची संपूर्ण माहिती या पोर्टलवर उपलब्ध होणार आहे . त्यामुळे कोणत्या शासकीय रुग्णालयात कोणत्या उपकरणांची तुट आहे .उणीव आहे , ती उपकरण नादुरुस्त आहेत किंवा संबंधित साहित्य चोरीस गेले आहे याबाबत ही माहिती मिळणार आहे. यावर उपाययोजना करण्यास मोठी मदत मिळणार आहे. परिणामी तांत्रिक साधनसामुग्रीचे केंद्रीकरण होऊन गोरगरीब सामान्य रुग्णांना अधिकाधिक आरोग्य सेवा मिळण्यास मदत होईल याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे खा. डॉ. अजित गोपछडे यांनी आभार व्यक्त केले आहेत.

# दिवाळी पहाट कार्यक्रम रद्द करण्याची पत्रकार कृती समितीची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १७ ऑक्टोबर-**

नांदेड जिल्ह्यात यावर्षी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढावले आहे. पूरपरिस्थितीमुळे शेतीचे आणि घरांचे प्रचंड नुकसान झाले असून अनेक शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडले आहेत. अशा परिस्थितीत जिल्हा प्रशासनाने आयोजित केलेल्या दिवाळी पहाट कार्यक्रमाला विरोध करत नांदेड जिल्हा पत्रकार कृती समितीने हा कार्यक्रम रद्द करण्याची मागणी केली आहे.



निवासी उपजिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात पत्रकार कृती समितीने स्पष्टपणे नमूद केले आहे की जगाचा पोशिंदा असलेला शेतकरी सध्या अडचणीत आहे. पुरामुळे त्यांचे संसार उघड्यावर आले असून आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी शासनाची मदत अपुरी आहे. अशा स्थितीत जिल्हा प्रशासनाने दिवाळी पहाट सारखा मनोरंजनात्मक कार्यक्रम आयोजित करणे हे शेतकऱ्यांच्या जखमांवर मीठ चोळण्यासारखे आहे असा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

पत्रकार कृती समितीने यावेळी सुचवले आहे की दिवाळी पहाट कार्यक्रमासाठी नियोजित केलेला निधी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वापरावा. विशेषतः ज्या शेतकऱ्यांना तांत्रिक अडचणींमुळे अद्याप मदत मिळालेली नाही, अशा शेतकऱ्यांना या निधीतून मदत करण्यात यावी, अशी विनंती समितीने केली आहे.

या निवेदनाद्वारे पत्रकारांनी जिल्हा प्रशासनाकडून सामाजिक भान ठेवण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. संकटग्रस्त शेतकऱ्यांना सावरण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेणे गरजेचे आहे आणि त्याऐवजी अशा कार्यक्रमांवर खर्च करणे ही असंवेदनशीलता आहे असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.





अतिवृष्टीमुळे शेतकरी आर्थिक संकटात असला तरी आपली हिंदू संस्कृती जपण्यासाठी दिवाळी सण उत्साहात साजरा करण्यासाठी काही प्रमाणात का होईना दिवाळीचे आकाश दिवे, पणत्या बाजार पेठेत विक्रीसाठी उपलब्ध झाले आहेत. (छाया-कृष्णा शिंदे)

# राष्ट्रवादीच्या बैठकीत प्रवेशासाठी गर्दी; खा.सोनवणेंकडून कार्यकर्त्यांना ताकद देण्याचा शब्द

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑक्टोबर**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने दि.१६ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष केज तालुक्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण बैठक येडेश्वरी साखर कारखाना युनिट नं.१, आनंदगाव (सा.) येथे संपन्न झाली. यावेळी बैठकीत कार्यकर्त्यांनी प्रवेशासाठी अक्षरश: रांग लागली होती. यावेळी आगामी निवडणूक कार्यकर्त्यांची निवडणूक असल्याने कार्यकर्त्यांच्या पाठिशी उभा राहून ताकद देऊ, असा विश्वास खा.बजरंग सोनवणे यांनी दिला.

येडेश्वरी साखर कारखाना येथील बैठकीत बनसारोळा येथील माजी जि.प.सदस्य अशोक गायकवाड, माजी सरपंच युवराज काका काकडे, चिंचोलीमाळी येथील लहुजी वस्ताद सेवाभावी संस्था चे अध्यक्ष विठ्ठल झाडे, पिसेगाव येथील नवनाथ नेहरकर, आनेगावचे माजी सरपंच आप्पासाहेब हंडीबाग, श्री. एकनाथ हंडीबाग, विष्णू इंगळे, बिभीषण राऊत, विक्रम हंडीबाग, भैरवनाथ हंडीबाग, श्रीधर हंडीबाग, लक्ष्मण हंडीबाग, श्री. जिवराज हंडीबाग, श्री. नरसिंग हंडीबाग, नवनाथ हंडीबाग, अशोक हंडीबाग, नानासाहेब हंडीबाग, ज्ञानेश्वर खोडसे, श्री. दशरथ हंडीबाग, श्री. तुकाराम इंगळे, युसूफ वडगाव येथील युवा कार्यकर्ते विजय भूमकर, शिवानंद खरबड, शांतिलिंग खरबड तसेच असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश केला. बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद चंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्षा मा.आ.संगिता ठोंबरे, मा.आ.पृथ्वीराज साठे, पं.स.केज माजी सभापती अशोक तात्या तारळकर, खरेदी विक्री संघ केजचे अध्यक्ष बालासाहेब दादा बोराडे, मा.जि.प.सदस्य युवराज गोरे, माजी अध्यक्ष विलास जोगदंड, पंचायत समिती केजचे माजी सभापती ज्ञानेश्वर चवरे, केज तालुकाध्यक्ष शंकर जाधव, महिला तालुकाध्यक्ष तसलीम इनामदार, केज शहराध्यक्ष शब्दो खतीब माजी पं.स.सदस्य बंडू चौधरी, पिंटू ठोंबरे, गुंडाप्पा भुसारी, प्रेमचंद कोकाटे, न.पं.केजचे नगरसेवक भाऊसाहेब गुंड, बालासाहेब जाधव, माजी नगरसेवक कपिल मस्के, शरीफ सय्यद, शितल लांडगे, विमल जोगदंड, व पंचक्रोशितील सर्व सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक तसेच असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# राज्यस्तरीय व विभागस्तरीय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धांसाठी तयारीला वेग

## जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली पूर्वतयारी नियोजन बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑक्टोबर**

राज्यस्तरीय तसेच विभागस्तरीय क्रीडा स्पर्धांचे यंदाचे आयोजन भव्य स्वरूपात करण्यात येणार असून त्याच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहा पूर्वतयारी बैठक संपन्न झाली.

या बैठकीस जिल्हा क्रीडा अधिकारी, पोलीस अधीक्षक प्रतिनिधी, आरोग्य विभागाचे अधिकारी, शिक्षण विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच विविध क्रीडा संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत जिल्हाधिकारी यांनी सांगितले की, ही स्पर्धा म्हणजे जिल्ह्यातील तरुणाईसाठी एक उत्तम व्यासपीठ आहे. खेळाडूंना योग्य सुविधा, निवास, भोजन व वैद्यकीय सुविधा वेळेवर उपलब्ध होणं आवश्यक आहे. त्यांनी सर्व संबंधित विभागांना समन्वयाने काम करून स्पर्धेच्या तयारीत कोणतीही कमतरता राहू न देण्याचे निर्देश दिले.तसेच क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट आलेल्या खेळाडूंना उत्तम प्रकारची ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन त्यांचा उत्साहा वाढावा यादृष्टीने त्यांचा यथोचित गौरव करण्यात यावा.

या स्पधेत १७ वर्षे मुले व मुली. सहभागी होऊ शकतील. या स्पर्धा दि. २९ ते ३१ ऑक्टोबर या दरम्यान बीड येथे छत्रपती संभाजी मैदान येथे व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजन करण्यात येणार आहेत.

जिल्हाभरातून आणि विभागातील विविध तालुक्यांतून खेळाडू सहभाग घेणार आहेत.

महत्त्वाचे निर्णय:

सर्व खेळांच्या मैदानांची साफसफाई व आवश्यक दुरुस्ती तत्काळ पूर्ण करण्याचे आदेश सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आले.आरोग्य विभागाने वैद्यकीय पथकाची नियुक्ती करावी, तसेच प्रत्येक मैदानावर प्राथमिक उपचार किट उपलब्ध ठेवण्यात यावे.पोलीस विभागाने वाहतूक व सुरक्षेच्या दृष्टीने नियोजन करावे. स्थानिक विद्यालये व महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची स्वयंसेवक म्हणून नेमणूक करण्यात यावी.

बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकारी यांनी सर्व विभागांना समन्वयाने काम करून ही स्पर्धा एक आदर्श आयोजन ठरेल, यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

युवा महोत्सव सांस्कृतीक नवोक्रम व विकसीत भारत

जिल्हास्तर व विभागस्तर युवा महोत्सव आयोजन समिती यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विकसित भारत सांस्कृतिक नवोपक्रम विकसित भारत सांस्कृतिक नवोपक्रमासाठी जिल्हा व विभागस्तरीय युवा महोत्सव

जिल्हा व विभागस्तर युवा महोत्सव आयोजन समिती यांच्या अध्यक्षतेखाली विकसित भारत २०४७ या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक नवोपक्रम बैठकीत युवा महोत्सवाच्या आयोजनासाठी आवश्यक असलेल्या विविध बाबींवरही सविस्तर चर्चा करण्यात आली. यात सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन, युवक-युवतींची निवड प्रक्रिया, पारंपरिक व आधुनिक कलांच्या सादरीकरणाची रूपरेषा, प्रचार व प्रसाराचे माध्यम, तसेच आयोजनासाठी लागणाऱ्या सुविधांची पूर्वतयारी यावरही चर्चा करण्यात आली.

विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी युवकांचे योगदान महत्त्वाचे आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून नवोदित कलाकारांना व्यासपीठ मिळेल आणि त्यांच्यातील कलागुणांना चालना मिळेल.

तसेच, सर्व संबंधित विभागांनी परस्पर सहकार्याने नियोजन वेळेत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले.या महोत्सवातून केवळ सांस्कृतिक उन्नतीच नव्हे, तर सामाजिक एकात्मता, पर्यावरण संवर्धन, डिजिटल साक्षरता अशा अनेक विषयांचा समावेश असणार आहे.शेवटी सर्व उपस्थितांनी उत्साहपूर्वक सहभाग देत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पूर्ण सहकार्याचे आश्वासन दिले.शशबैठकीपूर्व जिल्हा क्रिडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी प्रस्ताविक केले.

# आरोग्य कर्मचारी महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑक्टोबर**

आरोग्य कर्मचारी महासंघाच्या जिल्हाध्यक्षपदी अशोक ठोसर तर उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची निवड करण्यात आली.

आरोग्य कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष विजय मोहरकर आणि राज्यउपाध्यक्ष शेळके व बाबासाहेब राख यांच्या विशेष उपस्थितीत आरोग्य कर्मचारी महासंघ बीड जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यासाठी बैठक घेण्यात आली. यात जिल्हाध्यक्षपदी अशोक रामनाथ ठोसर यांची तर जिल्हा उपाध्यक्षपदी करणकुमार जोगदंड यांची सर्वांमध्ये निवड जाहीर करण्यात आली. यावेळी जिल्हा हिवताप अधिकारी विजयसिंह शिंदे, सुनिल गायकवाड, जीवन सानप, एस. पी कुलकर्णी, सुधाकर कुलकर्णी, राजेश कोलुगडे यांनी उपस्थित राहून नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या. संघटनेच्या कामाला गती देण्यासाठी आणि आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी ही निवड महत्त्वाची ठरणार आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अशोक ठोसर यांनी कर्मचाऱ्यांच्या हितासाठी महासंघ कटीबद्ध राहील असे आश्वासन दिले यांप्रसंगी महासंघाचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

# प्रा.डॉ.सिद्धार्थ मस्के यांचा गुजरात उच्च शिक्षण विभागाकडून गौरव

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१७ ऑक्टोबर**

केसापुरी वसाहत येथील प्रा.डॉ.सिद्धार्थ श्रीहरी मस्के (डउजझए) सोसायटी फॉर क्रियेशन अपोर्च्युनिटी थ्रू प्रोफीशीयंसी इन इंग्लिश प्रकल्प उच्च शिक्षण विभाग गुजरात आणि केंब्रिज विद्यापीठ,यू.के.यांच्या संयुक्त उपक्रमा अंतर्गत दक्षिण गुजरात विभागातून गर्वनमेंट आर्टस् अँड कॉमर्स कॉलेज,अहवा जि. डांग यास पहिली रँक प्राप्त झाल्याबद्दल या विशेष कामगिरीसाठी उच्च शिक्षण विभाग,गुजरात द्वारा गर्वनमेंट आर्टस् अँड कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य डॉ.यु.के.गांगुर्डे व आहवाचे स्कोप समन्वयक डॉ.सिद्धार्थ श्रीहरी मस्के यांना प्रमाणपत्र तसेच कॉलेजला मोमेंटो देऊन गौरव करण्यात आला.तसेच उत्तीर्ण विदयार्थ्यांना केब्रिज विद्यापीठचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आला असून त्यांना सौ.वृंदावणी श्रीहरी मस्के, डॉ.सविता सिद्धार्थ मस्के,पदमीन सिताराम मस्के,संध्या विजय मस्के,सुनील मस्के,अनिल मस्के,कलावती श्रीकांत मस्के,प्रा.शिवदास घाडगे,उत्तमराव वाघमारे,प्रा. प्रसेंजित मस्के,भागवत सिरसट,ॲड.रविकांत उघडे यांच्यासह सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




# प्रा.नरेशकुमार जैस्वाल यांना पीएचडी प्राप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑक्टोबर**

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ अंबाजोगाई संचलित फार्मसी कॉलेज अंबाजोगाई येथील प्रा. नरेशकुमार जैस्वाल यांना मध्यप्रदेश विद्यापीठाकडून नुकतीच पीएचडी पदवी प्राप्त झाली आहे. प्रा नरेशकुमार जैस्वाल यांनी मानसरोवर ग्लोबल युनिव्हर्सिटी, मध्य प्रदेश. मधून फार्मासुटिकल सायन्स या विषयात पीएचडी मिळवली आहे.

एनहांसमेंट ऑफ सोलुबीलीटी फोर प्युअरली सोल्यूबल ड्रग्स हा त्यांच्या प्रबंधाचा विषय होता. या विषयात जैस्वाल यांनी सखोल अभ्यास करून व त्यावर अनेक बाबींवर संशोधन करून



आपला प्रबंध मध्यप्रदेश विद्यापीठास दाखल केला होता. दाखल केलेल्या प्रबंधाचा विचार व अभ्यास करून मानसरोवर ग्लोबल युनिव्हर्सिटी मध्यप्रदेशच्या वतीने प्रा नरेशकुमार जैस्वाल यांना नुकतीच त्या विष्यायावर पीएचडी प्रदान केली आहे. या पीएचडी साठी त्यांना डॉ. अमित कुमार अग्रवाल यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले.

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत प्रा नरेशकुमार जैस्वाल यांनी हे यश संपादित केले आहे. श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक राजकिशोर मोदी, अध्यक्ष भूषण मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्रा. वसंत चव्हाण, डॉ. डी.एच. थोरात , टी. बी. गिरवलकर कॉलेज ऑफ इंजीनियरिंग चे प्राचार्य डॉ. बी. आय. खडकभावी, प्रा बिराजदार , प्रा राजमाने सर, प्राचार्य डॉ. संतोष तरके यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, मित्र परिवाराच्या वतीने प्रा नरेशकुमार जैस्वाल यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# कपिलधारवाडीतील सर्पदर्शमुळे गायीचा मृत्यू

## गावकऱ्यांची शासनाकडे मदतीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ ऑक्टोबर**



बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेने ग्रामस्थांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी सुंदरराव बलभीम शिंदे यांच्या दुभत्या गायीचा सर्पदर्शनामुळे मृत्यू झाला असून, या घटनेने शिंदे कुटुंब आर्थिक संकटात सापडले आहे.गावातील भूस्खलन आणि घरांना तडे गेल्याने महावितरणकडून वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. त्यामुळे गाव अंधारात बुडालेले असताना, सर्पाने गोठ्यात प्रवेश करून गायीवर हल्ला केल्याचे समजते.शेतकरी शिंदे यांचे मुख्य उत्पन्न दुभत्या गायींच्या दुधावर अवलंबून आहे. त्यामुळे या गायीच्या मृत्यूमुळे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. याशिवाय वीज नसल्याने गुरांसाठी पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे.गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, वीज व पाणी व्यवस्थेच्या अभावामुळे गुरे व शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. त्यांनी शासनाकडे तातडीने वीजपुरवठा सुरू करण्याची व गुराढोरांसाठी पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

सध्या कपिलधारवाडीतील काही कुटुंबे स्थलांतरित झाली आहेत, तर उर्वरित ग्रामस्थ शासनाच्या मदतीची वाट पाहत आहेत. गावकऱ्यांचे मत आहे की, प्रशासनाने योग्य ती उपाययोजना न केल्यास अशा घटना पुन्हा घडू शकतात.

शेतकऱ्यास नुकसानभरपाईची मागणी

ग्रामस्थांनी प्रशासनाकडे पंचनामा करून शिंदे यांना योग्य नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, शासनाने तत्काळ मदत न केल्यास शेतकरी व पशुसंवर्धन क्षेत्र दोन्हीवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

# प्रकाशाचा विजय : २०२५ च्या सावल्यांतून उगवणारी दीपावली

अंधाराचा अंत हाच प्रकाशाचा जन्म असतो - ही ओळ २०२५ च्या जगाला अगदी साजेशी वाटते . युद्ध , नैसर्गिक आपत्ती , आर्थिक चढउतार , आणि तंत्रज्ञानाच्या वेगवान लाटेमुळे जग आज एका विचित्र द्वंद्वातून जात आहे . माणूस प्रगतीच्या प्रकाशात पुढे जातोय , पण मनाच्या गाभाऱ्यात थकलेला दिसतो . अशा पार्श्वभूमीवर दीपावली पुन्हा एकदा सांगते - आशेचा दिवा कधीही विझू देऊ नकोस .



दीपावली हा फक्त सण नाही , तर भारतीय संस्कृतीचा श्वास आहे . प्रत्येक दिवा म्हणजे उजेडाची प्रार्थना , प्रत्येक रांगोळी म्हणजे आनंदाचे चित्र , आणि प्रत्येक फुलबाजीतून उमटणारी चमक म्हणजे आशेचा ठिणगा . परंपरेने हा सण अंधारावर प्रकाशाचा , असत्यावर सत्याचा आणि दुःखावर आनंदाचा विजय साजरा करणारा आहे.

दीपावली पर्व - पाच दिवसांचा प्रकाशोत्सव

भारतामध्ये दीपावली हा एक दिवसाचा नव्हे , तर पाच दिवसांचा प्रकाशोत्सव आहे. या प्रत्येक दिवसाचा एक सुंदर अर्थ आहे .

पहिला दिवस - धनत्रयोदशी : आरोग्य आणि संपत्तीचे प्रतीक , या दिवशी धन्वंतरी देवतेची पूजा होते.

दुसरा दिवस - नरक चतुर्दशी (लहान दिवाळी) : श्रीकृष्णाने असुर नरकासुराचा वध केला , म्हणून हा दिवस वाईटावर चांगुलपणाचा विजय म्हणून साजरा होतो .

तिसरा दिवस - लक्ष्मीपूजन (मुख्य दिवाळी) : या रात्री लक्ष्मीदेवीची आराधना केली जाते . घराघरांत दिव्यांची रांग , सुगंधी फुले , रांगोळ्या आणि गोडधोड पदार्थांची रेलचेल असते .

चौथा दिवस - पाडवा (बलिप्रतिपदा) : राजा बळी आणि विष्णू यांची कथा स्मरून कृतज्ञतेचा सण म्हणून पती-पत्नी एकमेकांप्रती स्नेह व्यक्त करतात .

पाचवा दिवस - भाऊबीज : भाऊ-बहिणींच्या प्रेमाचा उत्सव . बहिण भावाला आरती करून दीर्घायुष्याची प्रार्थना करते .

ही परंपरा केवळ धार्मिक नाही , तर भारतीय कुटुंब व्यवस्थेतील आपुलकी आणि ऐक्य यांचे प्रतीक आहे .

२०२५ हे वर्ष विरोधाभासांनी भरलेले ठरले . युरोपमध्ये युद्धाचे सावट , मध्यपूर्वेतील संघर्ष , आणि आफ्रिकेतील दुष्काळ - या सर्वांनी मानवतेच्या मुळावर घाव घातला . तुर्कीतील भूकंपाने हजारो कुटुंबे उद्ध्वस्त झाली , तर हवामान बदलामुळे जगभरात नैसर्गिक आपत्तींची मालिका सुरू राहिली . परंतु या अंधारातही काही उजेडाचे किरण होते - कृत्रिम बुद्धिमत्तेतील प्रगती , आरोग्य क्षेत्रातील नवे संशोधन , आणि अवकाशात झेप घेणारा भारत . चांद्रयान - ३ च्या यशानंतर आता मंगळयान - २ ची तयारी सुरू आहे . ' मेड इन इंडिया 'च्या बळावर भारताने आत्मनिर्भरतेचा नवा अध्याय लिहिला आहे .

आजची दीपावली परंपरा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम घडवते . शहरांत स्मार्ट दिवे , इको-फ्रेंडली रांगोळ्या आणि डिजिटल शुभेच्छा , तर गावांत मातीच्या दिव्यांचा मंद उजेड आणि श्रद्धेचा सुगंध . लक्ष्मीपूजनाच्या रात्री घराघरांत दिव्यांची माळ झळकते , पण खरा प्रकाश माणसाच्या अंतःकरणात झिरपतो . दिवा जळतो तो दुसऱ्यांसाठी ही म्हण आजही तितकीच खरी आहे . पाडव्याच्या दिवशी पती-पत्नीतील स्नेहाचे बंध दृढ होतात , तर भाऊबीजेच्या ओवाळ्यात भाव-बहिणींचे नाते उजळते .

जगभरातही दीपावलीचा प्रकाश पसरला आहे . लंडन , न्यूयॉर्क , सिंगापूर , मॉरिशस , आणि कॅनडा येथे ' फेस्टिवल ऑफ लाइट्स ' म्हणून भारतीय संस्कृतीचा हा उत्सव साजरा होतो . २०२५ मध्ये लंडनच्या ट्रॅफल्गर स्क्वेअरवर सस्टेनेबल दिवाळी या संकल्पनेखाली प्लास्टिकविरहित सजावट आणि एकत्रित प्रार्थना करण्यात आली . तमसो मा ज्योतिर्गमय या मंत्राचा अर्थ जग आता अनुभवत आहे .

फटाक्यांच्या धुरात हरवणाऱ्या आकाशाने आपल्याला विचार करायला लावले आहे . त्यामुळे हरित दिवाळीचा संकल्प अधिक बळावतोय . दिवे लाव , पण मनही उजळव - हा संदेश आजची तरुण पिढी सोशल मीडियावर ट्रेंड बनवतेय . रांगोळ्यांच्या रंगांबरोबर विचारांचे रंगही उमटत आहेत .

या वर्षी अनेक दुःखद घटना घडल्या असल्या तरी , मदतीचा हात पुढे करणारे लोकच या जगाचा खरा प्रकाश आहेत . भारतीय स्वयंसेवी संस्था , डॉक्टर्स आणि युवकांनी आपत्तीग्रस्त भागात जाऊन मदतीचा दिवा पेटवला . दीप तोच खरा , जो दुसऱ्याच्या अंधारात उजेड करतो - या वाक्यात या वर्षीची दिवाळी जिवंत आहे .

२०२५ च्या या दीपावलीत भारत नव्या आत्मविश्वासाने उजळला आहे . विज्ञानात पुढे , संस्कृतीत ठाम , आणि मानवतेत तेजस्वी - हीच खरी प्रगती . अंधार कितीही गडद असो , एका छोट्याशा दिव्याने तो हरवता येतो .

दीप जळत राहो , मन उजळत राहो , आणि माणुसकीचा प्रकाश कधीच विझू नये - हीच प्रार्थना , हीच खरी दीपावली .

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके
तहसीलदार , बीड

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# प्रत्येक बालकात क्षमता आहे, फक्त योग्य दिशा द्या : डॉ. अनुपम टाकळकर

छत्रपती संभाजीनगर -डिस्लेक्सिया अवेअरनेस मंथ निमित्त इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर शाखेच्या वतीने डिस्लेक्सिया व स्लो लर्निंगवरील विशेष कार्यशाळा आयएमए सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडली.

या उपक्रमास शिक्षक, मानसशास्त्रज्ञ आणि पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल २५० शिक्षकांनी या कार्यशाळेसाठी नोंदणी केली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी *डॉ. अनुपम टाकळकर अध्यक्ष, आयएमए छत्रपती संभाजीनगर होते. प्रमुख अतिथी म्हणून माध्यमिक विभागाच्या मुख्य शिक्षणाधिकारी डॉ श्रीमती अश्विनी लाठकर मॅडम* उपस्थित होत्या. विशेष कार्यशाळेचे संयोजन *डॉ. अंजली बंगलोरे (आयकॉन क्लिनिक) यांनी केले. त्यांनी डिस्लेक्सिया या विषयावर सखोल मार्गदर्शन करताना या मुलांना वेळेत ओळखून योग्य शैक्षणिक सहाय्य देण्याचे महत्त्व अधोरेखित केले.



कार्यक्रमात *फर्स्ट रिस्पॉन्स टू एमर्जन्सी सिच्युएशन या विषयावर डॉ. अमोल कुलकर्णी डॉ. प्रीती भाग्यवंत आणि डॉ. कुंदा धुळे* यांनी उत्कृष्ट प्रात्यक्षिक सादर केले. शाळांमधील आपत्कालीन परिस्थितीत शिक्षकांनी कसे तत्परतेने प्रतिसाद द्यावा याचे प्रशिक्षण देण्यात आले.

मंचावर प्रमुख अतिथी आणि कार्यक्रमाच्या अध्यक्षांसोबतच उपशिक्षणाधिकारी श्रीमती नीता श्रीश्रीमाळी, आयएपी अध्यक्ष डॉ. अभिजीत जोशी तसेच आयएमएच्या माजी अध्यक्षा डॉ. उज्वला दाहीफळे उपस्थित होत्या.

डॉ. अनुपम टाकळकर* म्हणाले की प्रत्येक मूल वेगळ्या पद्धतीने शिकते आणि त्याची ओळख लवकर झाल्यास त्याला मदत करणे सोपे होते. शिक्षक हा मुलांचा पहिला निरीक्षक असतो आणि त्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. आयएमएने समाजाभिमुख उपक्रम राबविण्याची परंपरा कायम ठेवली असून शिक्षण व आरोग्य यांच्यातील समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. समाजात जागरूकता वाढविणे हेच आजच्या काळाचे खरे शस्त्र आहे, असेही त्यांनी नमूद केले. शिक्षक, पालक आणि डॉक्टर जर एकत्र आले, तर कोणतंही मूल मागे राहणार नाही- डॉ अनुपम टाकळकर

डॉ. अश्विनी लाटकर मॅडम* म्हणाल्या की अशा कार्यशाळा डॉक्टर आणि शिक्षक यांना एकत्र आणून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी नवी दिशा देतात. शिक्षण विभागाकडूनही अशा जनजागृती व प्रशिक्षण उपक्रमांना पाठबळ दिले जाईल. प्रत्येक मुलामध्ये शिकण्याची क्षमता असते, फक्त योग्य मार्गदर्शन आणि संयमाची गरज असते, असे त्यांनी सांगितले.

डॉ. अभिजीत जोशी यांनी आयएमएच्या या उपक्रमाचे कौतुक केले व बालरोग तज्ज्ञ आणि शिक्षक यांच्यातील सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले.

डॉ. अंजली बंगलोरे* यांनी सांगितले की डिस्लेक्सिया ही अपंगता नसून शिकण्याची वेगळी पद्धत आहे. शिक्षक आणि पालक यांची जाणीव वाढली तर या मुलांचे भविष्य उज्वल होऊ शकते.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व मान्यवर, मार्गदर्शक आणि उपस्थितांचे आभार मानून समारोप करण्यात आला.

इंडियन मेडिकल असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर* शाखेने पुन्हा एकदा समाजाभिमुख आणि शैक्षणिक क्षेत्रात आदर्शवत कार्य केले आहे.

विशेष कार्यशाळेचे संयोजन डॉ. अंजली बेंगळुरू, पेडियाट्रिशियन व डेव्हलपमेंटल न्युरोलॉजिस्ट, यांनी केले. त्यांच्या सोबत कविता अग्निहोत्री, स्पीच अँड लँग्वेज थेरपिस्ट, आणि शांभवी देशपांडे, क्लिनिकल साइकोलॉजिस्ट, यांनी विशेष मेहनत घेतली . या सर्वांनी डिस्लेक्सिया म्हणजे नेमके काय, त्याची लक्षणे, ओळख आणि प्रभावी शिक्षण पद्धती यावर सविस्तर मार्गदर्शन केले.

अभ्यासगट घेऊन ड्श्रे ड्शरीपशी मुलांना जास्तीत जास्त मदद करण्यासाठी खउजछ उशर्पीश गेली १५ वर्ष कार्यरत आहे. या कामात प्रत्येक शाळा जर सामील होईल तरच या मुलांच्या समस्या हळुहळू सुटत जातील. म्हणुन प्रत्येक शाळेने या कार्यशाळेत सहभाग नोंदवावा ही विनंती!

# एमजीएममध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय पालि परिषद यशस्वीपणे संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.१७ : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीज आणि भारतीय व विदेशी भाषा संस्थेच्या वतीने 'पालि : जन-जन की बोली' या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेचा समारोप समारंभ रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी , कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, धम्मा लिपी अभ्यासक अतुल भोसेकर, दिल्ली विद्यापीठाचे डॉ.धम्मदीप वानखेडे प्रा.योजना भगत, डॉ.संजय मोहड, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, संचालक डॉ.के.पी.सिंग, अभ्यासक, प्राध्यापक व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

या परिषदेमध्ये देशभरातून पालि भाषेचे अभ्यासक सहभागी झाले होते. सुमारे २५० अभ्यासकांनी या परिषदेसाठी नोंदणी केली होती. यातील ८७ शोध निबंध अभ्यासकांनी सादर केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते शोधनिबंधाच्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले होते.

गौतम बुद्धांनी पालि भाषेच्या माध्यमातून आपले तत्वज्ञान सांगितले. पालि भाषा त्याकाळी सर्व सामान्य लोकांची होती. या भाषेवर संशोधन व्हावे तसेच नवीन पिढीला पालि भाषेचे महत्व कळावे, या उद्देशाने या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेच्या यशस्वीतेसाठी डॉ.ह.नि. सोनकांबळे, डॉ.भागवत वाघ, प्रा.सुप्रिया सांगवीकर व सर्व संबंधितांनी आपले योगदान दिले.

## सैनिक कल्याण पुणे विभागात माजी सैनिकांसाठी लिपिक-टंकलेखक पदांची भरती

छत्रपती संभाजीनगर, दि.१७ - सैनिक कल्याण विभाग तसेच त्याच्या अधिपत्याखालील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमध्ये लिपिक-टंकलेखक (गट-क) या एकूण ७२ पदांच्या भरतीसाठी फक्त माजी सैनिक उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले आहेत.या पदांपैकी एक पद दिव्यांग संवर्गासाठी राखीव असून, किमान ४० टक्के दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांपैकी दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार कर्तव्ये व जबाबदारी विचारात घेऊन, गुणवत्ता व उपलब्धतेनुसार नियुक्ती करण्यात येणार आहे.




# जागतिक ट्रॉमा दिनानिमित्त ट्रॉमा उपचारांविषयी जनजागृती

छत्रपती संभाजीनगर : जागतिक ट्रॉमा दिनानिमित्त, मेडिकव्हर हॉस्पिटल्सने लोकांना स्मरण करून दिलं की ट्रॉमा म्हणजे केवळ रस्ते अपघात नव्हे - तो कुठेही, कधीही होऊ शकतो. महामार्गावरील वेगवान धडक, घरगुती पडझड, औद्योगिक अपघात, कामाच्या ठिकाणी झालेल्या दुखापती किंवा भावनिक धक्के - प्रत्येक घटनेचा परिणाम शरीरावरच नव्हे तर मनावरही होतो. प्रत्येक जखमेमागे एक कथा असते - भीतीची, जगण्याची आणि पुनर्प्राप्तीची - आणि तिच्यासाठी वेळेवर, संवेदनशील आणि सर्वसमावेशक वैद्यकीय मदत अत्यावश्यक असते.



भारतामध्ये दरवर्षी सुमारे ४.६ लाख रस्ते अपघात घडतात, ज्यात १.५ लाखांहून अधिक मृत्यू होतात आणि जवळपास ३ लाख लोक गंभीर जखमी होतात. तज्ज्ञांच्या मते, या मृत्यूंपैकी जवळपास ५०% मृत्यू गोल्डन अवरमध्ये योग्य उपचार मिळाल्यास टाळता येऊ शकतात. परंतु प्रतिसादात झालेला थोडासा उशीर - अंतर, भीती किंवा जागरूकतेचा अभाव - हे जीवन आणि मृत्यू यामधील फरक ठरू शकतात.

मेडिकव्हर हॉस्पिटल्सने आपल्या अत्याधुनिक आपत्कालीन आरोग्यसेवा आणि तज्ज्ञांच्या नेटवर्कच्या माध्यमातून देशभरात ट्रॉमा केअरमध्ये विश्वासार्ह नाव मिळवलं आहे. हॉस्पिटलमधील २४७ आपत्कालीन विभाग, न्यूरोसर्जरी, ऑर्थोपेडिक्स, जनरल सर्जरी आणि क्रिटिकल केअर विभागातील तज्ज्ञ, आधुनिक ट्रॉमा आयसीयू, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर आणि रॅपिड रेस्पॉन्स अँब्युलन्स सेवा - या सर्व सोयींमुळे गंभीर रुग्णांना अत्यावश्यक क्षणी जगातील दर्जेदार उपचार मिळतात.

पण मेडिकव्हरसाठी ट्रॉमा केअर म्हणजे फक्त जीवन वाचवणे नव्हे, तर जीवन पुन्हा उभं करणे आहे. हॉस्पिटलचा ट्रॉमा रिकव्हरी प्रोग्रॅम रुग्णांच्या रिहॅबिलिटेशन, फिजिओथेरपी, पेन मॅनेजमेंट आणि मानसोपचार सल्ला यावर भर देतो, जेणेकरून अपघातानंतर रुग्ण पुन्हा आत्मविश्वासाने आणि स्वतंत्रपणे जगू शकतील. त्यांचा हेतू स्पष्ट आहे - जखमा नाही, तर जीवन बरे करणे.

ट्रॉमा ट्रीटमेंट म्हणजे फक्त जीव वाचवणे नव्हे; तर थांबलेलं जीवन पुन्हा सुरू करणे आहे, असं डॉ. डॉ विशाल कुटे सेंटर हेड , मेडिकव्हर हॉस्पिटल्स, छत्रपती संभाजीनगर यांनी सांगितले. गोल्डन अवरमध्ये दिलेली तात्काळ मदत अनेक जीव वाचवू शकते. प्रत्येक मिनिट महत्त्वाचं असतं, आणि प्रत्येक रुग्णाला पूर्णपणे - शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या - सावरण्याची संधी मिळायला हवी.

या जागतिक ट्रॉमा दिनी, मेडिकव्हर हॉस्पिटल्स सर्वांना आवाहन करतं - हेल्मेट वापरा, सीटबेल्ट लावा, घरात व कार्यस्थळी सुरक्षा नियम पाळा, आणि जवळच्या ट्रॉमा-रेडी हॉस्पिटलचं स्थान जाणून ठेवा. कारण तयारी आणि वेळेवर कृती - अनेक जीव वाचवू शकतात.

कार्यक्रमात डॉ विशाल कुटे, सेंटर हेड यांनी योगदान सादर केले,डॉ मिलिंद दुनखें,डॉ आनंद डंक,डॉ पुनीत मालपाणी, डॉ किशोर मुंडे,डॉ स्वरूप बोराडे, डॉ अविनाश कचरे यांची उपस्थिती होती.




